# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २८.३.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.३१) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक २८ मार्च २००६ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.१० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. खान मुजीब मिर आलम खान
(०२) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०३) श्री. गवळी रविकांत काशीनाथ
(०४) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०५) श्री. गवळी रविकांत काशीनाथ
(०६) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०७) सौ. दलाल लता श्रीनिवास
(०८) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०९) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(१०) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(११) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(१२) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१३) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१४) श्री. संतोष सुधाकर जेजुरकर

**संवाद :**

श्री.मुजीब खान : आजच्या सकाळ दैनिकात जी महानगरपालिकेकडे पाण्याची १२४ कोटीची थकबाकी होती . त्यापैकी ८२ कोटी माफ झालेले आहे. संबंधीत मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करण्यात यावे. मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती, मा.सभागृहनेता, मा.विरोधी पक्ष नेता तसेच जेष्ठ सदस्य यांनी यासाठी प्रयत्नकेले त्यांनाही धन्यवाद देतो. ना.अजित पवार यांचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री. बैनाडे कवरसिंग : आताच अभिनंदनासाठी प्रस्तावित केले आहे त्यास अनुमोदन देतो. जी बातमी आलेली आहे त्याचा खूलासा घेण्यात यावा. खरोखरच इतकी महापालिकेकडे बाकी होती का?

मा. सभापती : पाणी आणण्यासाठी महानगरपालिकेला मोठा खर्च येतो त्यामूळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे महानगरपालिकेकडे १२५ कोटीचे देणे आहे. जेपाण्यासाठी विद्युत पंप वापरले जते ते ग्रामीण भागात असून त्याप्रमाणे विज बिल आकारावे म्हणून सर्वसाधारण सभेने १९९७ ला तसा ठराव करून शासनाकडे पाठवून पाठवूरावा होत होता. जे यश यायला पाहिजे होते ते आलेले नाही. परंतू सहा महिण्यापूर्वी शासनाची एक योजना होती ज्या मनपाकडे थकबाकी आहे अशा महानगरपालिकेने त्या योजनेत सहभाग घेतला तर पूढील जी थकबाकी राहील ती त्या महापालिकेने

समान तीन हप्त्यात भरावी लागेल व तसा लेखी प्रस्ताव आला तर विचार करून असे म्हटलेले होते व तसा प्रस्ताव शासनाकडे दिलेला होता व आजरोजे थकबाकी माफ केली तसे लेखी अधिकृत शासनाकडून काहीही आलेले नाही. वृत्तपत्राच्या आधारे माहिती झाली आहे. ८० ते ८५ कोटी माफ होतील अशी अपेक्षा आहे. चांगल्या निर्णयासाठी सर्वांच्या भावना लक्षात घेवून अभिनंदन करण्यात येत आहे.

श्री. मुजीब खान : आजच्या सभेला काही अधिकारी उपस्थित नाही.स. सदस्य वेळेवर येतात अधिकारी येत नाही याचे कारण काय याचा खूलासा करावा व अशा अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी.

श्री. शंशाक विसपूते : अनेक प्रश्न मांडावयाचे होते. माहिती घ्यायची होती. परंतू अधिकारी उपस्थित नाही गाभीर्य लक्षात घ्यावे व संबधी अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी.

सौ. लता दलाल : अधिकाऱ्यांना आजची बैठक माहित नाही का, बैठकीचे महत्व वाटले नाही का? अधिकारी का गैरहजर आहे याचा खूलासा घेण्यात यावा. आपल्या कडे कोणकोणत्या अधिकाऱ्यानी माहिती दिलेली आहे. याची गंभीर नोंद घ्यावी. आम्ही जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी येतो. अधिकाऱ्याना बैठकीचे महत्व वाटत नाही असे जणवते.

श्री. रेणूकादास वैद्य : आजच्या सभेला अधिकारी उपस्थित नाहीत. मागच्या वर्षी प्रशासन ज्या पध्दतीने वागत आले त्यावरून असे दिसते की, महापालिका प्रशासनास लोकप्रतिनिधीला सहकार्य करावे अशी भावनाच दिसत नाही. या बाबतीत गंभीर विचार करून आजच्या आजठोस कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.

श्री. मुजीब खान : अधिकारी हे कार्यालयात सूध्दा उपलब्ध नसतात. विचारणा केली असता व्हिजीटला गेले. कामा निमित्त बाहेर गेले असे सांगण्यात येते. असे असेल तर आम जनतेची कामे कशी होणार.

श्री. विनायक पांडे : अनेक प्रश्नावर स. सदस्यांनी वर्षभरापासून प्रश्न मांडतात अनेक संचिका मिळत नाही. अशी परीस्थिती आहे. आजच्या सभैला अधिकारी उपस्थित नाही. याची गंभीर दखल घ्यावी व कार्यवाही करावी.

श्री. कवरसिंग बैनाडे : सभागृहात अधिकारी वेळेवर येत नाही. लोकप्रतिनिधी येतात. अधिकारी सभागृहाच्या बाहेर थांबलेले आहे त्यांना येण्याची परवानगी दयावी व यापूढे वेळेवर येण्या संबधी ताकीद देण्यात यावी.

मा. सभापती : अधिकारी बैठकीलाउपस्थित नाही सर्व सदस्यांनी खंत व्यक्त केली आहे. काही सदस्यांनी अशाही भावना व्यक्त केल्या की अधिकारी सभागृहा बाहेर आलेले आहे त्यांना सभागृहात प्रवेश दयावा. त्यानूसार सर्व अधिकारी यांनी सभागृहात येण्याची परवानगी देण्यात येते. यापूढे सर्व अधिकारी यांनी सभेला वेळेवर उपस्थित रहावे अशी ताकीद देण्यात येते.

(याच वेळी बाहेर उभे असलेले सर्व अधिकारी सभागृहात येतात. )

श्री. विनायक पांडे : दोन तीन बैठकापासून रॅबीजलस बाबत बोलत आहे. त्यासाठी आठ लक्षची तरतूद ठेवलेली आहे. मागणी केलेली आहे की नाही याचा खूलासा करावा.माझ्या माहिती प्रमाणे कोणत्याही आरोग्य केंद्रामधे ती लस नाही.

मा. सभापती : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खूलासा करावा.

आरोग्य वैद्य. अधिकारी : रॅबीजलसीबाबत दोन लसी घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. प्रश्न असा होता की ही रॅबीजची लस महानगरपालिकेने दयायची की वैद्यकीय महाविदयालय यांनी दयायची .या संबधी प्रस्ताव वैद्यकीय महाविदयालय घाटी यांचेकडून तीन महिण्यापूर्वीच आलेला होता.

श्री. विनायक पांडे : वैद्यकीय महाविद्यालय (घाटी )येथे कशासाठी द्यायचे, महानगरपालिकेनेच वापरावे. एक वर्ष झाले, अनेक लोकांना कुत्रे चावले. संबंधीत अधिकारी त्याची दखल घेत नाही.

आरोग्य वैद्य. अधिकारी : प्रत्येक वर्षी यावर तरतूद असे परंतू गरज पडत नव्हती. पूर्वी ही लस कमी किमतीत मिळत होती. आता ती कंपनी बंद झालेली आहे.

श्री. मुजेब खान : लोकांना कुत्रा चावल्यामूळे त्रास होत आहे . ३०० ते ४०० रूपयाची एक लस घेत आहे. अधिकारी सांगतात की गरजपडत नव्हती. योग्य खूलासा होत नाही.

श्री. विनायक पांडे : अनेक लोकांना कुत्रा चावल्यामूळे त्रास आहे. ४०० रूपयाचे एक लस घ्यावी लागत आहे पूर्ण कार्स होईपर्यत चार ते पाच लस घ्यावी लागत आहे. अधिकारी सांगतात गरजपडली नाही.

आरोग्य वैद्य. अधिकारी : पूर्वी जे लस होती ती ॲन्टी रॅबीज लस म्हणून होती. तीची किंमत कमी होती. वैद्यकीय महाविद्यालयास ती सहज उपलब्ध करून घेता येत होती. आज परीस्थिती अशी की त्यावर बंदी आल्यामूळे ही महागडी औषधी आहे ती घेवून वैद्यकीय महाविद्यालयास पुरवत नाही.

श्री. विनायक पांडे : जेबजेट ठेवले जत होते ते कोठे वापरले आहे.

आरोग्य वैद्य. अधिकारी : जेबजेट ठेवले जत होते ते वापरले गेलेले नाही.

श्री. मुजेब खान : शहरात डासाची संख्या मोठया प्रमाणात झालेली आहे. चेलीपूरा रोषणगेट जवळील नाल्यात मोठया प्रमाणात घाण साचलेली दिसून येते. त्याकडे प्रशासनाचे लक्ष नाही. तीन महिने झाले कुठे औषधी फवारणी झालेली दिसून येत नाही. शहरात अनेक नागरीकांना कुत्रे चावत आहे. त्याची दखल घेतली जत नाही. नाल्या काठच्या अनेक कुटूंबातील लहान मुलाना आजर झालेले आहे दवाखान्यात संख्या वाढलेली आहे.त्यांचेकडे औषधोपचारासाठी पैसे नाहीत, मनपाच्या आरोग्य केंद्रांकडे कुणाचेही लक्ष नाही. महापालिका लाखो रूपये खर्च करते परंतू गरीबासाठी दवाखान्यात औषधी उपलब्ध नाही. डासांचा प्रादुर्भाव, फवारणी नाही. खाजगी दवाखान्यात रांगा लागल्या आहेत. कोणत्याही निधीचा योग्य विनियोग होत नाही. याचे कारण काय खुलासा घेण्यात यावा.

श्री. विनायक पांडे : अत्यंत गलथान असा कारभार झालेला दिसतो. औषध फवारणी करणारे लोक नगरसेवकांना येवून भेटतात औषधी फवारणी केल्याचे दाखवितात. ठराविक ठिकाणीच फवारणी होते. तसेच शहरात अनेक नागरीकांना कुत्रे चावत आहे. त्याचीही दखल घेतली जत नाही. दोन चार कुत्रे पकडतात पून्हा त्यांना दुसरीकडे सोडून दिले जते.

मा. सभापती : रॅबीज लसीकरीता बजेटमधे ७ लक्षची तरतूद केलेली होती. अनेक नागरीकांना गोरगरीब जनतेला त्याचा लाभ होत नाही. महापालिकेच्या दवाखान्यात सूविधा उपलब्ध करून देणे अपेक्षीत असतांना केली जत नाही. कर्तव्याची जण नाही.

तरतूद आसतांना रॅबीज लस का खरेदी करण्यात आलेले नाही याचा खूलासा करावा.

आरोग्य वैद्य. अधिकारी : ही लस यापूर्वी महानगरपालिकेने कधीच खरेदी केलेली नाही. पहिल्यादाच अशी परीस्थिती झाली की वैद्यकीय महाविद्यालय(घाटी) यांनी ही जबाबदारी नाकारली व महानगरपालिकेकडे मदत मागीतली.

श्री. कवरसिंग बैनाडे : महानगरपालिकेचे कर्तव्य नाही का? तरतूद ठेवलेली असतांना का खरेदी केलेले नाही एवढाच खूलासा करावा.वैद्यकीय महाविदयालय ही लस खरेदी करण्यास बांधील आहे काय? बजेट होते तर खरेदी करावयास पाहिजे

श्री. रविकांत गवळी :आरोग्य वैद्यकीय अधिकारी चूकीचा खूलासा करीत आहे. या संबधीची संचिका मा. आयुक्ताकडे गेलेली होती. पूढील कार्यवाही का करण्यात आलेली नाही.

श्री. विनायक पांडे : संबधीत आरोग्य वैद्य. अधिकारी यांचे मेडीकल करण्यात यावे अशी विनंती आहे.

सौ. लता दलाल : महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र किती आहे. कोणती औषधी फवारणी केली जते व किती कर्मचारी वर्ग तेथे आहे औषधी फवारणी केंव्हा केली जते मलेरीया चे कर्मचारी किती आहे फॉगींग मशीन किती आहे नादूरूस्त किती आहे व नोव्हॉन किंवा अबेट किती प्रमाणात पाण्यात टाकले जते याची माहिती संबधीत अधिकारी देवू शकतील का? माझ्या माहिती प्रमाणे त्यांचेकडे ही माहिती नाही. संबधीत अधिकाऱ्याचे त्यांचे विभागावर नियंत्रण नाही असे वाटते. एक दोन वेळेस आरोग्य विभागा संबधी माहिती मागविलेली होती त्याची माहिती मला मिळालेली नाही. शहरात व राज्यात मोठया प्रमाणात आजराची साथ आलेली आहे असे असतांना या विभागाचे लक्ष का नाही. रॅबीज लस घाटी देत असेल किंवा देत नसेल. महानगरपालिकेने जर त्यासाठी बजेट ठेवले होते तर का खरेदी केलेले नाही. या पूर्वी या सभागृहात चर्चा झाली होती की, अनेक भागात कुत्रे चावतात. माझ्याही वार्डात दोन मुलांना कुत्रे चावले त्यावेळी आठवण करून दिली होती. आतापर्यंत का कार्यवाही झालेली नाही. हे खरेदी करू नये म्हणून प्रशासनाने नकार दिलेला होता का असे असेल तर तोही खूलासा करावा. आपले नियंत्रण आहे असे वाटत नाही. वृत्तपत्रात रोज बातम्या येत आहेत. ५-१० लोकांचा मृत्यू झाल्यावर कार्यवाही करणार का? शहरात अनेक ठिकाणी डासांचे प्रमाण वाढलेले आहे. किती औषधी फवारणी होते. किती प्रमाणात नोव्हॉन टाकले जते याची माहिती आता मिळेल का?

आरोग्य वैद्य.अधिकारी : आताच माहिती देता येणार नाही.

सौ. लता दलाल : या शहराचे महानगरपालिकेचे आपण प्रमुख अधिकारी असतांना आपणाकडे माहिती नाही. हे बरोबर नाही. सभागृहाची अधिकारी दिशाभूल करीत आहे. महानगरपालिकेचे प्रमुख अधिकारी असून हे नागरीकाच्या आरोग्याशी खेळत आहे. असा माझा स्पष्ट आरोप आहे. १६ लीटर पाण्यात ५ एमएल औषधी टाकले जते त्यामूळे खरोखरच डास नष्ट होतात का हे सूध्दा बघायला पाहिजे उर्वरीत औषधांचे काय, वारंवार सांगण्यात आले, चौकशी करावी.

श्री. मुजीब खान : शहरातील जेवढेही नाले आहेत त्या नाल्याची केंव्हा साफसफाई झालेली आहे व तेथे काय उपाययोजना करण्याची गरजआहे तसा रिपोर्ट प्रशासनाकडे दिलेला आहे काय? शहरात मुख्य नाल्यात मोठया प्रमाणात घाण साचलेली असून नागरीकांना

चालणे कठीण झालेले आहे एवढी दुर्गंधी येते. माझ्या वार्डात स्लम भाग आहे शहाबाजर झोपडपट्टी भाग आहे तेथे अनेक नागरीक आजरी आहेत तेथील नाल्याचे कामाबाबत मी सूचविले होते. मा.आयुक्त सर्व्हे करणार होते. दोन महिने झाले अद्याप पाहणी केलेली नाही. आरोग्य विभागातील कर्मचारी काम करीत नाही. त्यांचे त्वरीत बदल्या करण्यात याव्यात अशी विनंती आहे.

मा. सभापती : कुत्रे चावल्यानंतर जे लस देण्यात येते ती दोन कंपण्याचे लस कॉन्ट्रक्ट रेट प्रमाणे पर्सेस करण्याचे या सभागृहाने आदेशीत केलेले होते.. आरोग्य विभागा मार्फत मा. आयुक्त यांचेकडे संचिका मंजूरीसाठी गेलेली होती. आजपर्यंत ती लस का मागविण्यात आलेली नाही. याची जबाबदारी कुणावर होती. त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल. प्रोसेस झाल्यानंतर संचिका कुणाकडे थांबलेली होती याचाही खूलासा करावा.

आरोग्य वैद्य. अधिकारी : मध्यतंरी एक महिना मी रजेवर होतो. या संचिकेवर लेखा विभागाचा चर्चा करावी म्हणून आक्षेप आला होता.

मा. सभापती : लेखा विभागाला क्यूरी काढण्याचा अधिकार आहे का? हे योग्य नाही. या सभागृहाचा आदेश जर कुणी अधिकारी पाळत नसेल तर त्यांचेवर कार्यवाही करावी लागेल.

मा. आयुक्त : दोन कंपनीचे लस घेण्यासाठी आदेश दिलेले आहे. मागणी का केलेली नाही काय अडचण होती याचा खूलासा सबधीत अधिकारी यांनी करावा.आज तीन वाजेपर्यंत आदेश काढावेत. पुर्वी घाटी दवाखान्यात उपलब्ध करून घेतले जत होते, आता त्यांचेकडे नाही. माझे मत असे आहे की, ५०% लस घाटी दवाखान्यात द्यावे, ५०% महापालिकेच्या दवाखान्यात ठेवावे.

मा. सभापती : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सूचना करण्यात येते की त्यांनी आज दुपारी ३ वाजेपर्यंत रेट कॉन्ट्रॅक्ट(आरसी) प्रमाणे या दोन कंपन्यापैकी जे उपलब्ध असेल त्यांना पुरवठा करण्याचे आदेश आजच पारीत करावे. लस उपलब्ध झाल्यानंतर ५०% घाटी दवाखान्यात पूरवावे व ५०% महापालिकेचे प्रत्येक वॉर्ड कार्यालयाच्या हद्दीत असेलेले आरोग्य केंद्रात पुरविण्यात यावे. मागणी केलेल्या आदेशाची प्रत सभापती यांचे दालनात पाठविण्यात यावी. तसेच मलेरीया विभागाचे कर्मचारी ज्या ज्या भागात साफसफाईसाठी किंवा औषधी फवारणीसाठी जतील त्यावेळी त्या वार्डाचे स. सदस्यांना तशी माहिती देवून कामास सूरूवात करावी. उद्यापासून आपण विभागवार लक्ष केंद्रीत करावे व आरोग्य विभाग सक्षम होत नाही तोपर्यत आरोग्य वैद्य अधिकारी यांनी वैद्यकीय रजेशिवाय कोणतीही रज मंजूर करू नये अशा प्रशासनास सूचना देण्यात येत आहेत.

श्री.कवरसिंग बैनाडे : दिवसा औषध फवारणी न करता सांयकाळच्या वेळेस फवारणी केल्यास आठ दिवसात मोठया प्रमाणात डासाचा नायनाट होईल.

श्री. मिलींद दाभाडे : औषध फवारणी केल्यानंतर मच्छर डास मरतात का याची तपासणी अधिकारी यांनी कधी केलेली आहे का? माझ्या वार्डात अनेक लोक १५ ते २० दिवसापासून तापाने आजरी आहेत. त्यांना चालता येत नाही. तरी आजच्या आज आरोग्य पथक पाठविण्यात यावे. त्या नागरीकांवर औषधोपचार करावे.

मा. सभापती : स.सदस्य श्री मिलींद दाभाडे यांचे वार्डात आजच्या आज आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टारांचे पथक पाठवून कार्यवाही करावी.

श्री.मुजीब खान : यापूर्वी १९८८ मध्ये नाले व्यवस्थित साफसफाई होत होते आज का होत नाही. आरोग्य विभाग कुचकामी का झालेला आहे. नाल्यातील गाळ काढला जत नाही. आजच्या स्थितीला नाल्याची सफाई होत नाही. नाला प्रवाह सुरळीत होणेसाठी सर्व्हे केला का? वरतून औषध फवारणी करून उपयोग होणार नाही. संबधीत अधिकारी यांनी तसा रिपोर्ट प्रशासनाकडे केलेला आहे का?

मा.सभापती :आरोग्य विभागातील श्री. बोराडे कर्मचारी यांना सूचना करण्यात येत आहे की जे मलेरीया विभागातील फावडा पार्टी आहे त्यांचेकडून शहरातील सर्वनाल्याची सफाई करण्यात यावी. आवश्यक वाटल्यास जेसीबी मशीन वापरून कार्यवाही करावी व कार्यवाही होत असल्याचा अहवाल ३१ तारखेच्या बैठकीत सादर करावा.तसेच मलेरीया विभागातील कर्मचारी यांना विविध भागात औषधी फवारणी करण्याच्या सूचना कराव्यात.

श्री. शंशाक विसपूते : गुंठेवारीचे काम कशा पध्दतीने चालू आहे याचा आढावा घेणे जरूरी आहे. माझ्या वार्डात गुठेंवारीचे काम संथ गतीने चालू आहे. काही ठिकाणी रस्ते बंद होत आहे नॅचरल स्लोप बंद होत आहे. त्या संबधी कार्यवाही होणे अपेक्षीत आहे कारण अनेक ठिकाणी पाणी साचत आहे व नागरीकांना त्याचा त्रास होत आहे. अनेक लोकांनी पहिली रक्कम भरणा करून एक ते दीड महिना झालेला असून त्यांचे घराची मोजणी झाली नाही त्यांना दुसरी नोटीस नाही. काही लोक पैसे भरणा करण्यासाठी येतात तर तेथे आरक्षण असल्याचे कार्यालयाकडून सांगण्यात येते. तांत्रिक अडचण काढण्यात येत आहे. संबधीत सर्वे करणारी कंपनी वर अधिकाऱ्याचे काहीही नियत्रंन नाही. या बाबतीत विचार करून लवकरात लवकर सुधारणा करण्यात यावी.

मा.सभापती : ७५० रूपयाच्या नोटीसा किती नागरीकांना देण्यात आलेल्या असून किती नागरीकांनी महापालिकेकडे रक्कम जमा केलेली आहे तसेच ज्यांनी रक्कम भरणा केली त्यांना चलनभरणा करण्या संदर्भात किती लोकांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. विकास खर्च म्हणून किती रक्कम आतापर्यत जमा झालेली आहे या संदर्भात एजन्सीच्या बाबतीत संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

सहा. संचालक न.र. : गुंठेवारीच्या सर्व्हेसाठी ७ एजन्सीची नियुक्ती केलेली असून एजन्सीनिहाय माहिती देण्यात येत आहे.

१. सिमा कन्सल्टंट यांनी अलहिलाल कॉलनी, बिस्मील्ला कॉलनी, न्यु नंदनवन कॉलनी, सर्व्हे नं.२३ ते २७, सध्या कटकटगेट परिसरात सर्व्हे चालू आहे. नोटीस दिलेली संख्या २०००, २५०० घरांचा सर्व्हे केला. रू.७५१/-भरून २३५ प्रस्ताव तयार झाले. त्यापैकी ८१ संचिका तयार झाल्या. ५०% चलन दिले यात त्यांची संख्या १८ व १००% चलन दिलेल्याची संखया ५, ५०% चलन भरलेल्याची संख्या १ आहे. मंजूर संचिका ३ आहेत. दाखला निर्गमीत करण्यासाठी थांबून ठेवलेल्या आहे. या माध्यमातून रणरूण८२,८५८/- जमा झालेले आहेतण

२. प्रशांत सर्व्हीसेस पुणे-या एजन्सीला सिडकोतून अधिसूचित क्षेत्रातून वगळलेला भाग संपूर्ण दिला आहे. जयभवानीनगरचा सर्व्हे चालू आहे. ६२०० मालमत्ता एकूण या एजन्सीने सर्व्हे केला. ५२०० लोकांना नोटीसेस दिल्या. २६३० लोकांनी ७५१/-भरणा केले असून ७२ संचिका दाखल केल्या आहेत. ६०७ लोकांना ५०% चे चलन दिले. १००% चे चलन ४ लोकांना दिले. ५०% चलन ३ लोकांनी भरणा केले, १००% चलन कुणीच भरणा केले नाही. मंजूर संचिका एक आहे. ४८,५२१/- रूपये जमा झालेले आहेत.

३. सनकॉन इंजिनिअरींग पुणे-या एजन्सीस बौध्दनगर, उत्तमनगर, विष्णूनगर, नाथनगर, अरिहंतनगर सर्व्हेसाठी दिले आहे. ४००० मालमत्तांचा सर्व्हे केलाण २३०० लोकांना नोटीसा दिल्या. ५०७ लोकांनी ७५१/- रूपये भरणा केले. २४० संचिका दाखल केल्या. ५०% चलन दिले ती संख्या ६४, १००% चलन दिलेल्यांची संख्या ९. ५०% चलन भरलेल्यांची संख्या ३ असून १००% चलन भरलेल्यांची संख्या ७ आहे. मंजूर संचिका एक आहे. एकूण रक्कम रू.१,९२,४९२/- जमा झाले आहेत.

४. इन्फ्रास्ट्रक्चर पुणे- या एजन्सीस राधास्वामी कॉलनी, हिनानगर, गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी, खत्रीनगर, वानखेडेनगर तसेच जटवाडा परिसर सर्व्हेचे काम दिले आहे. ३००० मालमत्तांचा सर्व्हे झाला. २००० लोकांना नोटीसा दिल्या, २२५ लोकांनी ७५१/- रूपये जमा केले. १५ संचिका सादर झाल्या. पुढे प्रगती नाही.

५. होताने पाटील- या एजन्सीस हर्सूल स.नं.१९०, ९१,९२, ९३, ८० स.नं.१५, १८, १५४ ते १५८, जधववाडी १५६ व १३८ चा सर्व्हे करीत आहे. एकूण ३७३५ मालमत्तांचा सर्व्हे केला. २५०० लोकांना नोटीसा दिल्या. ८५८ लोकांनी ७५१/- रूपये भरणा केले. १४९ संचिका दाखल, १८ लोकांना ५०% चलनउ दिले, ५ लोकांना १००% चलन दिले. २ लोकांनी ५०% चलन भरणा केले, ५ लोकांनी १००% चलन भरणा केले. ३ संचिका मंजूर केल्या. एकूण रू.१,०४,०००/- जमा झााले.

मा. आयुक्त : या संबधीची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी.

मा. सभापती : सर्व सदस्यांना त्याची लेखी प्रत देण्यात यावी.

सहा.संचालक न.र. : सर्व स.सदस्यांना लेखी प्रत देण्यात येईल.

श्री.मुजेब खान : गुंठेवारी मधे कोणकोणता भाग येतो या संबधीची माहिती अद्याप सदस्यांना दिलेली नाही. हिनानगर, आलमगिरी कॉलनी हे गावठन मधे दाखविण्यात येते. पुन्हा तेथील सर्वे होत आहे आताच खूलासा की तेथे सर्वे होत आहे. महानगरपालिकेकडे त्या संबधीचे नकाशे रेकॉर्ड आहे की नाही. आलमगिर कॉलनी हिनानगर हे गुंठेवारीत येत नाही यापूर्वी मा.आयुक्त यांनी खूलासा केलेला होता. पून्हा तेथे नोटीसा देवून ८० हजर रूपये जमा केले हे योग्य नाही.चार पाच दिवसापासून मी कार्यालयात येत आहे अधिकारी त्यांचे दालनात भेटत नाही. १० महिण्याचा कालावधी गेला कोणतेही कामे होत नाही .अधिकाऱ्याना भैटण्यासाठी वेळ निश्चित करावा.

सहा. संचालक (न.र.) : गावठानच्या आत असो की बाहेर ज्यांचे रेखांकन करता येते . रेखांकन न होता जेथे खरेदी विक्री झालेली आहे त्यास गुंठेवारी असे संबोधण्यात येते. हिनानगर मधे रेखांकन न होता जमीन विक्री झालेली आहे.

श्री.मुजीब खान : यापूर्वी ती वसाहत गावठाणमधे येते म्हणून मा. आयुक्तांनी खुलासा केलेला होता. आता अधिकारी सांगतात गुंठेवारीत येते. हे योग्य नाही. अधिकारी दिशाभूल करीत आहे. योग्य खूलासा करण्यात यावा.

मा. आयुक्त : ज्या वसाहती बसलेल्या आहेत त्या नियमाधिन करण्यासाठी शासनाने गुंठेवारी कायदा काढला आहे. यात जेभाग होत आहे तो अनेक लोक एन ए न करता घर बांधतात. तसेल लेआऊट करतांना महानगरपालिकेची परवानगी घ्यावयास पाहिजे ती घेत नाही. तिसरेअसे की डी.पी. प्लॅनमधे रस्ता येतो त्यावर काही लोकांनी घरे बांधलेली आहे. चौथा भाग असा की रजिस्ट्री न करता खरेदी केलेले आहे. हे चार पाच कायद्याचे भंग झालेला आहे. गावठाण मधे ९९ टक्के जे बांधकाम झालेले आहे ते डीसी रूल अंमलात येण्यापुर्वी बांधकाम झालेले आहे. ते गुंठेवारीमधे येत नाही. गावठाण मधे एन.ए. करण्याची गरज भासत नाही. ऑलरेडी ते एन.ए. मध्ये गृहीत धरले जते. त्यावर काही बंधन नसते. परंतू एखादया गावठाणच्या ठिकाणी प्लॉट आहे व महानगरपालिकेची बांधकाम करतांना परवानगी घेतलेली नाही व जेंव्हा डीसी रूल आले त्यानंतर बांधकाम परवानगी घेतलेली नसेल तर त्या लोकांनी एक संधी म्हणून त्यांनी ते गुंठेवारीत रेग्यूलर करून घ्यावे. तसा येरीया गावठाण मध्ये फारच कमी आहे. एक एकर पेक्षा जस्त आहे ते लेआऊट करून तेथे बांधकाम होणे आवश्यक आहे. तसे केले नसेल तशा लोकांना गुंठेवारीत रेग्यूलर करून घेण्याचीसंधी आहे. गावठाण मधे आरक्षण असेल तर जर तेथे २००१ पूर्वी जर बांधकाम असेल तर ते गुंठेवारीत रेग्यूलर करण्यास संधी आहे. परंतू जेघर डीसी रूल येण्याच्या पूर्वी  झालेले आहे त्यास रेग्यूलाईज म्हणू शकत नाही.व त्यास गुंठेवारी कायदयाची अमबजवणी करणेचे कारण नाही. गावठाण मधे मोठा भाग येतो. जर या ठिकाणी कुणी अनधिकृत बांधकाम पाच दहा लोकांनी केले असेल तर त्यांचेमूळे पूर्ण भागास सूविधा देवू नये असे काहीही नाही. ज्यांनी बांधकाम केले त्यानी रेग्यूलाईज करावे किंवा ते पाडावे लागेल. गावठाणमधे सूविधा पूरविण्यास काही अडचण नाही.

श्री.मुजीब खान : हिनानगर आलमगीर कॉलनी वसाहत ही जूनी आहे गावठाण मध्ये येते. सर्वे करावा तेथे प्रत्येक नागरीकाच्या मालमत्तेस कर लागलेला आहे.जेअनधिकृत नळ कनेक्शन होते त्यांना रेग्यूलाईज करण्याचे मी स्वत: सांगितलेले आहे. नगररचना विभागात जे लोक इमानदारीने संचिका दाखल करतात त्याची संचिका पूटअप होत नाही, त्यांना व्यवस्थीत उत्तरे दिली जत नाही. ज्यांचेकडून मिळते त्यांचे संचिका पूटअप होतात. काही कारण दाखवून त्या नागरीकांना परत पाठवले जते पून्हा तो व्यक्ती कार्यालयात न येता अनधिकृत बांधकाम करतात. यास जबाबदार प्रशासन आहे. हिनानगर,आलमगिर कॉलनी अनेक वर्षापूवीच्या वसाहती आहेत. मला ही आठवत नाही तेंव्हा पासूनच्या आहे. या बाबतीत वारवार चर्चा होवूनही जुन्या घरमालकास नोटीसा दिल्या जत आहे हे योग्य नाही.  परवानगीसाठी लोक येतात.

त्यांना परवानगी दिली जत नाही. मनमानी काम कर्मचारी करतात. अशा अधिकाऱ्यांची त्वरीत बदली करावी.

श्री.शंशाक विसपूते : माझ्या प्रभागामधे गुंठेवारीमधे रेग्यूलर करून घेण्यासाठी नागरीक प्रयत्नशील असतांना चलन भरण्यास तयार असतांना किमान एक महिना चलन भरून घेतलेले नाही. त्यानंतर मा. आयुक्तांशी चर्चा केली.चलन भरून घेण्यास मा. आयुक्तांनी आदेश करूनही लोकांना परत पाठवले.

मा. सभापती : गुंठेवारी भागात विकास कामे व्हावीत म्हणून या वर्षी बजेटमधे तरतूद करण्यात आलेली आहे. गेल्या वर्षी अपेक्षे प्रमाणे काम झालेले नाही. गुंठेवारीचा सर्वे तात्काळ होवून या विकास कामास गती मिळाली पाहिजे अशी भावना सर्वच सदस्यांची आहे. ज्या नागरीकांना गुंठेवारीच्या संदर्भात नोटीसा दिलेल्या आहे त्या संबधी कार्यवाही करण्यासाठी जे योग्य तो निर्णय घेण्यासाठी संबधीत वार्ड अधिकारी तसेच एक कनिष्ठ अभियंता व त्या भागाचे संबधीत नगरसेवक यांनी संयूक्त समिती नियुक्त करण्यात येत आहे या समितीने एकत्रित येवून योग्य तो निर्णय घ्यावा. दोन हप्त्यातमधे रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करावी. व त्याची माहिती मा. आयुक्त तसेच सभापती मा. महापौर यांना देण्यात यावी.गुंठेवारीत रेग्यूलर करण्यासाठी काही आरक्षणामुळे अडचण आल्यास तसा ठराव प्रशासनाने सर्वसाधारण सभेत ठेवण्याच्या सूचना देण्यात येत आहे. त्रिसदस्यांच्या माध्यमातून गुंठेवारी राबवावी.

सौ.लता दलाल : स्पेक या संस्थेला मालमत्ताचे सर्वे करण्याचे काम दिले.या सभागृहात चर्चा झाल्यानंतर संपूर्ण शहरात या संस्थेने ॲसिसमेन्ट केल्यानंतर पून्हा ॲसेसमेन्ट नोटीसा पाठवित आहे मलाही एक नोटीस आलेली आहे. मुळ एन.आर.व्ही. कशी बदलली जते याचा खूलासा करावा तसेच एका घराच्या बाबतीत मूळ मालकाने दोन लोकांना घर विक्री केले दोघांचे नावाचे पीआर कार्ड तयार झाले दोघाना वेगवेगळे टॅक्स लागले .महानगरपालिकेत नामातंर केले असे असतांना सूध्दा स्पेक या संस्थेने मूळ मालकास तसेच ज्यानी ते घर घेतले त्या मालकासही नोटीस दिली याचे कारण काय? याचा अर्थ स्पेक ही संस्था चांगले काम करीत नाही.जवळपास एक लक्ष लोकाना रि ॲसीसमेंन्टच्या नोटीसेस दिलेल्या आहे. म्हणजे या लोकांनी वार्ड कार्यालयात जयचे सुनावणी दयायची त्यानंतर पूढील कार्यवाही होईल याचा अर्थ पूर्वी जे परीस्थिती त्याकडे आपण जत आहोत.सर्वेचा ठेका देवून उपयोग काय? एक वर्षाची सर्वेसाठी मूदत होती दोन वर्ष झाली आता आणखी मूदत वाढवून दिली, ज्या हेतूने सर्वेचे काम करावयाचे होते जे की मालमत्ताची संख्या वाढेल व मालमत्ता करात सूध्दा वाढ होईल तो उद्येश सफल झालेला नाही.महापालिकेच्या उत्पन्नावर परीणाम होत असेल तर हा ठेका संबधीत एजन्सीकडून काढून घेण्यात यावा. ज्या चूकीच्या पध्दतीने नोटीसेस दिलेल्या आहे त्या संबधी स्पेक या संस्थेला नोटीस द्यावी. अशा प्रकारच्या चूका होत असतील तर नागरीक सहन करणार नाही.गंभीर दखल घ्यावी.

श्री.मुजेब खान : रजिस्टर मेंन्टेन केले जत नाही. जेथे गरीब लोक राहतात तेथे या संस्थेने सर्वेचे काम केलेले दिसून येते. बाबा पेट्रोल पंप ते चिकलठाणा पर्यत मोठमोठयाहॉटेल आहे तेथे सर्वे केलेला आहे काय?

कर निर्धा.व संकलक : स. सदस्या सौ. लता दलाल यांनी प्रश्न उपस्थित केल्यानूसार मूळ मालकाने माहिती भरून देण्यास चूक केली असेल तर त्यानूसार तशी नोंद रेकॉर्डला आलेली आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सर्वेचे काम हाती घेण्यात आलेले असून काही जुने घरामधे मिळकत धारकांनी बदल केलेले असून पुर्वी पत्रे होते आता आरसीसी बांधकाम केलेले आहे, जुनेच मालमत्ता कर भरतो. मालमत्ता धारकांना जे कर यावयास पाहिजेतोच आकारला पाहिजेहा उद्देश यामागे आहे. ज्या घरामधे काहीही बदल झालेला नाही त्यांचेवर जस्तीचा कर लादला जणार नाही. करयोग्य मुल्य बदलत नाही.

सौ. दता दलाल : माझ्या सदनिकेचे सांगते आहे. कुठल्या प्रकारचे जस्तीचे बांधकाम केलेले नाही. ५८३ ऐवजे ११७७ ची नोटीस कशी येते. एका व्यक्तीच्या मालमत्तेची एनआरव्ही १४३६ होती ती २९०५ करण्यात आली. मुळ मालकाने घर विकले दोन लोकांनी ते घर घेतले दोघांचे दोन पीआर कार्ड झाले. नामांतर झाले. यापूर्वी त्यांनी वेगवेगळा कर भरणा केला आता पून्हा मूळ मालकास नोटीस व ज्यांनी घर घेतले त्या दोघांनाही नोटीस कशी जते. स्पेक संस्था बरोबर काम करते असे प्रशासनाचे मत आहे काय ?योग्य ती माहिती मिळावी ती संस्था चांगले काम करीत नसेल तर त्याचा ठेका रद्द करावा.

मा. आयुक्त : ज्या मालमत्तेचे क्षेत्र वापरात व टाईप ऑफ कन्ट्रक्शन बदलले नसेल तर त्या मालमत्तेस नवीन कोणतेही करवाढ करता येणार नाही. करयोग्य मुल्य बदलत नाही. स्पेक यासंस्थेने सर्वे केला तर एक लक्ष मालमत्ता आहे असे दिसून आले. या पैकी किती मालमत्तेला पूर्वी कर लागलेला आहे तो लिंक करण्याचा प्रयत्न केला. ते १०० लिंक झाले नाही जवळपास ४० हजर मालमत्तेचा नवीन सर्वेनूसार लिंक झालेले आहे उर्वरीत मालमत्ता लिंक झालेल्या नाही. त्यामूळे नाविलाजने एक लक्ष मालमत्ता धारकांना नोटीसेस दयाव्या लागल्या अनेक मालमत्ता अशा आहेत की त्यांचे वापरात काहीही बदल झालेला नाही त्यांना नव्याने नोटीसेस दिलेल्या आहे. अनेक लोकांना मालमत्ता एक दुसऱ्याना विक्री केल्या त्यांची नोद मनपाकडे नव्हती. यात २० हजर मालमत्ता अशा निघेल की जुने घर होते काहीही बदल नाही. परंतू त्यांना नोटीस दिलेली आहे. त्या लोकांनी दुपारी ३.०० वाजेच्या नंतर वार्ड कार्यालयात महानगरपालिकेचे कर्मचारी सूनावणी घेण्यासाठी बसलेले असतात. प्रत्येक दिवशी ४० ते ५० प्रकरणे निकाली काढत आहे.ज्यांचे मालमत्तेत काहीही बदल झालेला नाही त्यांचे करात वाढ होणार नाही.

श्री. मुजीब खान : नवीन नोटीस देवून अधिकारी कर्मचारी पैसे वसूल करण्याचे काम करीत आहे. बाबा पेट्रोल पंप ते चिकलठाणा पर्यत ज्या रस्त्यावरील मालमत्ता आहे त्याचा स्पेकने सर्वे केलेला आहे का याची माहिती दयावी. तसेच मागिल बैठकीत वार्ड कार्यालय क मधील काही रजिस्टरची पाने फाटलेली आहे ती गायब केलेली आहे या संबधी मी बोललो होतो लोक कर भरतात परंतू करदाता यांना वेगळी पावती व महानगरपालिकेच्या रेकॉर्डला संबधीताने दिलेली रक्कम जमा होत नाही. आजपर्यंत त्या बाबतीत कार्यवाही झालेली नाही.

श्री. रेणूकादास वैद्य : एक प्लॉट दोन लोकांनी घेतला ज्यांनी घेतला त्यांनाही नोटीस ज्यांनीविक्री केला त्यांनाही नोटीस मिळकतधारक २ व स्पेकने ३ लोकांना नोटीसा काढल्या. अशा

प्रकरणात कसा मार्ग काढणार आहे. महानगरपालिकेचे वसुली कमी होण्यास स्पेक ही एजन्सी कारणीभूत आहे असे माझे मत आहे. नोटीसेस दिल्या सुनावणीची वेळ दिलेली नाही. नागरीकामधे सभ्रम निर्माण झालेला आहे.

मा. आयुक्त : मुळ मालकास सुनावणीसाठी यावे लागेल. दोन तीन मिनिटात सूनावणी होईल. मार्ग निघेल. ३१ मार्च पूर्वी नोटीसेस दिल्या नाही तर मालमत्ता कर बुडेल.

सौ.लता दलाल : स्पेक या संस्थेने चांगल्या प्रकारे सर्वे केला असता तर जी चूक झाली ती झाली नसती. ज्याची नोद नाही त्या मालमत्ता नवीन आहे हे कळाले नाही का ?जर एक पासून ५० घराचा सर्वे सूरू झाला असेल व पूर्वी एक ते ३० घरे होती व उर्वरीत २० घरे नवीन आहे .हे त्यांचे सर्वेमध्ये दिसून आले असते. जी घरे सूटलेली आहे ती सर्वेच्या यादीत आली असती. सर्वे बरोबर केला नाही तर जी रक्कम त्यांना दिली ती कशासाठी दिलेली आहे. ही त्या संस्थेची चूकी आहे नागरीकांना का त्रास देत आहे.

मा. आयुक्त : सदर एजन्सीने जूने रजिस्टर वरील नोंद जशीच्या तशी घेतली असावी. फिजेकल सर्वे मधे असे व्हायला नको. ३१ मार्चपर्यत नोटीसेस देणे गरजेचे आहे नसता या वर्षाचा नवीन मालमत्तेचा कर मिळणार नाही. अनेक लोक पाच ते सहा वर्षापासून राहतात परंतू अदयाप ते कर भरणा करीत नाही. जवळपास २५ हजर ओपन प्लॉटस् आहेत. त्यास कर लागला जतो परंतू तो मालक भेटत नाही. या संबधी वृतपत्रात नोटीस दिली होती की कर लावून घ्यावा जे ओपन प्लॉट आहे त्या संबधीची नोटीस तेथे ठैवत आहोत. ओपन टॅक्स मालकाने १५ दिवसाच्या आत कर भरणा केला नाही तर ऑक्शन सुरू करण्यात येईल.ज्या नोटीसेस दिलेल्या आहेत यात २० हजर लोक जूने असतील.

सौ. लता दलाल : स्पेक या संस्थेने चूक केलेली आहे. कार्यवाही करण्यात यावी. दंड आकारण्यात यावा जेबील दयायचे आहे ते थांबवावे. या नोटीसेस मूळे नागरीकांना नगरसेवकांना तसेच प्रशासनास मोठा त्रास होणार आहे. केवळ स्पेक संस्था जबाबदार आहे असा माझा स्पष्ट आरोप आहे.

मा. सभापती : स्पेक या संस्थेबरोबर जे करारनामा झालेला आहे कायदेशीर बाबी तपासून महानगरपालिकेचा फायदा होईल व भविष्यात अडचणी निर्माण होणार नाही अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी. उत्पन्न वाढविण्यासाठी मदत घ्यावी.

श्री. मुजेब खान :ज्याचा ओपन प्लॉट आरक्षणामधे असेल तर त्या लोकांनीही कर भरावा का या बाबतीत खुलासा करावा. आरक्षणातील प्लॉट वगळून जे ओपन प्लॉट असतील त्यांचेकडून कर वसूल करावा तसेच वार्ड कार्यालय क मधे रजिस्टर मधील पाने फाटलेली आहेत. त्या संबधीत आजपर्यत कार्यवाही केलेली नाही तसेच जलना रोडवर बाबा पेट्रोल पंप ते चिकलठाणा पर्यत मोठमोठे बांधकाम झालेले आहे त्या इमारतीचा सर्वे स्पेकने केलेला नाही का. काही बदल झालेला आहे का याचाही खूलासा करावा. आकाशवाणी समोर ५० ते १०० नवीन दुकाने झालेली आहे आजपर्यत त्या दुकानांना कर लागलेला नाही यास जबाबदार कोण ?

श्री.विनायक पांडे : आरक्षीत जगेचा खुलासा झाला पाहिजे माझ्या वार्डातही एका व्यक्तीची दोन एकर जमीन १९७१ पासून आहे.

मा. सभापती : महापालिकेच्या हद्यीत अनेक ठिकाणी आरक्षीत जमीनी आहे. त्या जगा महापालिका आर्थिक परीस्थितीमूळे भूसंपादन करू शकलो नाही. अशा जगा किती

आहे किती जगा महापालिकेला घेणे गरजेचे आहे त्याचे सर्वेक्षण करून विकास आराखडयास शासनाची मंजुरी झालेली आहे. आरक्षणातून जगा वगळायची असेल तरी शासनाची मजूरीशिवाय करता येत नाही. प्रशासनास सूचना करण्यात येते की महानगरपालिका हद्यीत असलेले आरक्षणाची यादी तयार करण्यात यावी. भूसंपादनासाठी किती रक्क्म लागणार आहे. टीडीआर नूसार काही बाबतीत कार्यवाही होवू शकते का हे सूध्दा बघावे. तसेच शहरातील जलनारोड तसेच इतर ठिकाणी जे शॉपीग सेटर असतील किंवा इतर इमारती असतील त्यांनी भोगवटा प्रमाण पत्र घेतलेले नाही. अशा सर्व इमारतीना कर लावण्याच्या दृष्टीने नोटीसेस देण्यात याव्यात. ज्या खूल्या जगा आहेत त्या आरक्षीत असतील तर त्या बाबतीत कायदेशीर तपासणी करून कर लावण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री.मुजेब खान : ११२४ कर्मचारी भरती प्रकरणाचा अहवाला अदयाप आलेला नाही. ही भरती कशा प्रकारे करावी या संदर्भात मा. न्यायालयाने आदेशीत केलेले आहे. शासनाचे सूध्दा तसे निर्देश आहेत. ज्यांचा नोकरीत सामावून घेण्याचा हक्क होता असे १८ कर्मचारी यांना वगळण्यात आलेले आहे. त्यांना भरती करून घ्यावे.

श्री. रेणुकादास वैद्य : लिपीक, ग्रथंपाल व इतर पदा संदर्भात जहीरात देवून अर्ज मागविले होते. त्या संबधीत पूढील कार्यवाही अदयाप सूरू केलेली नाही.

मा. आयुक्त : २१,२२ मार्च ला परीक्षा घेण्याचे ठरविले होते. परंतू मध्येच आचारसंहिता लागल्यामूळे ती कार्यवाही थांबलेली आहे. निवडणूक आयोगाकडून परवानगी मागविली होती परवानगी मिळालेली नाही. निवणूका झाल्यानंतर परीक्षा घेण्यात यावी असे निर्देश होते.त्यामूळे प्रोसीजर थांबलेली आहे.

मा. सभापती : ११२४ कर्मचारी भरती संदर्भात चौकशी अधिकारी श्री. फड साहेब यांना आजच्या बैठकीत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या जे प्राथमिक अहवाल असेल त्या बाबतीत खूलासा करावा.

कर निर्धा. व संकलक : चौकशीसाठी माझी नेमनूक केली असून संचिका लिंक करणे या कामासाठी वेळ लागत आहे. जे प्राथमिक अहवाल दयायचा आहे तो आठ दिवसात दिला जईल.

मा. सभापती : प्राथमिक अहवाल काय आहे वाचून दाखवावा. माझ्या माहिती प्रमाणे तो आपणाकडे आहे.३१ तारखेच्या बैठकीला अंतिम अहवाल दयावा त्यानंतर सर्वसाधारण सभेकडे तो अहवाल पाठवायचा आहे.

कर निर्धा. व संकलक : चौकशी मध्ये जे आढळून आले त्यात असे की मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानूसार जी जेष्ठता यादी तयार करण्यात आली होती त्या यादी व्यतिरिक्त २२५ कर्मचारी भरती करण्यात आले आहे. विभाग निहाय जी यादी तयार करण्यात आली त्यात ३० मजूर यांचे नाव दोन वेळेस आहेत. प्रतिक्षा यादीतील सतत गैरहजर राहणाऱ्या मजूराची तसेच प्रतिक्षा यादीतून वगळण्यात आलेल्या मजूराची एकूण संख्या भरती निवड समितीस संबधीत विभागास माहिती विभाग निहाय स्पष्ट लेखी स्वरूपात देण्यात आल्याची नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. विभाग निहाय माहिती चौकशीसाठी मजूराची पाहिजे ती मिळालेली नाही. ११२४ कर्मचारी नोकर भरती ही विभाग निहाय केलेली आहे. त्या प्रमाणे विभागाकडून माहिती चौकशीसाठी आवशक होती.

मा. सभापती : अस्थापना विभागाचे अधिकारी यांनी चौकशीसाठी ज्या ज्या कागदपत्राची माहिती श्री. फड साहेब यांनी मागविली आहे ती देण्यात यावी हयगय होता कामानये नसता कार्यवाही करण्यात येईल.

कर निर्धा.व संकलक : कर्मचाऱ्याच्या ज्या वैयक्तिक संचिका आहे त्यात जवळपास ८० टक्के संचिकेत नियुक्तीचे आदेश नाहीत. १९९०-९२ मध्ये जे नोकरीस दाखविलेले आहे त्यांचे वय तपासले असता १५,१७ वर्ष येते. असे जवळपास ६० ते ७० कर्मचारी आहे. एक कर्मचारी तर १२ वर्षाचा आहे. त्यास सूध्दा नेमणूक दिलेली आहे. राखीव जगे संदर्भात जेरोष्टरप्रमाणे जेनॉमस् आहेत ते मजूर या पदासाठी लागू नाही असे शासनाने निर्देश आहे. जे शिपाई म्हणून होते त्याचीही यात नेमणूक दिलेली आहे रोष्टरचा वापर केलेला दिसून येत नाही. भरती करतांना सभागृहाची परवानगी घेतलेली नाही.सविस्तर अहवाल नंतर सादर करण्यात येईल.

श्री.मुजीब खान : प्रत्येक विभागातील वेगवेगळे कर्मचारी यात आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली करीत ही भरती केलेली दिसते. या भरती संदर्भात शासनाने जबाबदार म्हणून आयुक्त राहतील असे म्हटले आहे. मा. आयुक्तांची सूध्दा यात दिशाभूल केलेली आहे. जे अधिकाऱ्याच्या घरी काम करणारे कर्मचारी होते तसेच काही लिडरचे जवळचे लोक यात भरती केलेले आहे. जे यादीत होते त्यांना आजपर्यत घेतलेले नाही.१८ लोकांची यादी बाकी आहे त्यांना केव्हा नियुक्ती पत्र देणार आहे. दोन वर्षापासून ते त्यांचे हक्कापासून वंचित आहे.

मा.आयुक्त : यातील आठरा लोकांना घेण्या बाबत माझ्याकडे संचिका आलेली होती. परंतू अगोदर चौकशी होवू दया असे मी संबधीत चौकशी अधिकारी श्री. फड यांना म्हटले होते. जेपर्यत चौकशी अहवाल येत नाही तोपर्यत कार्यवाही करता येणार नाही. चौकशीमधे सर्व माहिती समोर येईल.

श्री.मुजीब खान : मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहे तसेच शासनाचे सूध्दा निर्देश आहे. या १८ कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपी नियुक्ती देण्यास काहीही अडचण येणार नाही.

श्री. मिलींद दाभाडे : जे १८ लोकांना घेण्यात आले नाही ते लोक त्यावेळी जे दलाल पैसे जमा करीत होते त्यांना भेटले नाही म्हणून त्यांना घेण्यात आले नसावे.चौकशीसाठी संबधीत मदत करीत आहेत का करीत नसतील तर त्या अधिकाऱ्याचे नाव चौकशी अधिकारी यांनी सभागृहासमोर सादर करावे.

कर निर्धा. व संकलक : माहिती मिळण्यास उशीर होतो. पत्र देवून माहिती मागवून घेत आहोत.

श्री. विनायक पांडे : अमोल गौंड नावाचे एक कर्मचारी मिश्रक या पदावर त्यांचे नाव १९९४-९५ पासून क्र १ वर होते . जी भरती करण्यात आली ती क्र २ पासून करण्यात आली. शिवाय मा. न्यायालयाच्या यादीत त्यांचे नाव आहे.

श्री. रेणुकादास वैद्य : जे प्राथमिक अहवाल आलेला आहे यावरून असे लक्षात येते की यात सर्व गोधळ झालेला आहे. सर्व चुकीच्या पध्दतीने झालेले आहे. सर्व नियमावली समोर असतांना शासनाचे निर्देश तसेच मा. न्यायालयाचे निर्देश असतांना त्यावेळचे जे जबाबदार अधिकारी होते त्यांचेवर कार्यवाही का करीत नाही ही सभागृहाची भावना आहे. जे अंतिम अहवाल येईल त्यात आणखी चूका येतील.

मा. सभापती : हा विषय गंभीर आहे. चौकशीसाठी कालावधी दिलेला आहे प्रशासनाचे सहकार्य मिळत आहे. जे अधिकारी चौकशीसाठी सहकार्य करीत नाही त्याचें तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहे. त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल. संपूर्ण अंतरिम अहवाल ३१ तारखेच्या बैठकीत संपूर्ण अहवाल सादर करावा. जे माहिती आता दिली त्याची संपूर्ण माहिती स. सदस्य यांना व सभापती यांना देण्यात यावी.

श्री. दिलीप गायकवाड : पन्नालालनगर येथील भूखंड घोटाळा प्रकरणाची चौकशी कुठपर्यंत आली आहे. त्या संबधीची माहिती देण्यात यावी.

श्री. रेणूकादास वैद्य : गारखेडा भूखंड प्रकरणा बाबत विधान परिषदेमधे प्रश्न उपस्थित करण्यात आलेला होता महानगरपालिकेने तेथे काय बाजू मांडलेली आहे याचा खूलासा करावा.

मा. सभापती : या संदर्भात नगरविकास विभागाने माहिती मागितली होती त्यावेळी प्रशासनाने या जगेचा कोणतोही रोख मोबदला दिलेला नाही व चौकशी नियुक्त केलेली असून चौकशी अहवाल येणे बाकी आहे जेदोषी निघतील त्यांचेवर कार्यवाही होईल अशी माहिती दिलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : मा.राज्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांची नांवे घोतली, दोषी वाटते असे मा.राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

मा.आयुक्त : असा खूलासा केला की कॅश रक्कम कूणालाही दिली गेली नाही. ज्या लोकांच्यामूळे अशी परीस्थिती उद्‌भवली कॅश देणे शक्य झाले किंवा कॅश उचलण्याचा प्रयत्न केला त्यांचे विषध्द डी ई सूरू केलेली आहे. जे शासकीय अधिकारी आहेत त्यांचे विरूध्द डीई सुरू करण्याचा अधिकार महापालिकेला नाही त्यासाठी संचालक नगररचना यांना कळविले की त्यांचे विरूध्द डीई सूरू करावी. राज्यमंत्री मा.श्री.टोपे साहेब यांनी त्यावेळी असे सांगितले की दोन महिण्यात चौकशी पूर्ण केली जईल व जेदोषी निघतील त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल. ज्याचे विरूध्द डीई सूरू केली होती त्या अधिकाऱ्याचे त्यांनी नावे तेथे बोलले होते. त्या संबधीचे संपूर्ण कागदपत्र तपासले जतील व पोलीस मधे जी चौकशी चालू आहे त्यानूसार जेदोषी निघतील त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

श्री. रविकांत गवळी : गेल्या १० महिन्यापासून नदीनाल्याचे काठी जेअतिक्रमण झालेली आहे त्यांना नोटीसेस दिलेल्या आहेत. कार्यवाही नाही. पून्हा पावसाळयाचे दिवस येण्याची प्रशासन वाट पाहत आहे.

मा. आयुक्त : सर्वसाधारण सभेने अमान्य केले. जगा पाहणी करून त्याचा पुन्हा लेआऊट करण्यात आलेला आहे. किमंत काढण्यात आलेली आहे. या सर्वसाधारण सभेत तसा प्रस्ताव येईल.

श्री.रविकांत गवळी : ज्या लोकांनी सरकारी मालमत्ता विकली आहे त्याचे विरूध्द काय कार्यवाही करणार आहे.पावसाळा सूरू होण्यापूर्वी निर्णय घेण्यात यावा.दोन महिनेच बाकी आहे.

मा. आयुक्त : मालमत्ताचा पूरावा दाखवल्यानंतरच ज त्या व्यक्तीने खरोखरच जगा विकत घेतली असेल व त्याचा मालकी हक्क असेल तर त्या व्यक्तीस तेवढीच जगा दिल्या जईल.ज्यांनी जगा विकली व ज्यांनी ती घेतली त्यांनी विकत देणाऱ्या विरूधद पोलीसात गुन्हा दाखल करावा. त्यास प्रशासन मदत करेल. ज

महापालिकेची जगा असेल व ती विक्री केली असेल तर महापालिका कार्यवाही करेल.

श्री. नासेर नाहदी : दहा महिण्यापासून खामनदीच्या संदर्भात या सभागृहात चर्चा होत आहे. आता पून्हा पावसाळा सूरू होईल पूर्वी जे परीस्थिती निर्माण झाली होती तीच परीस्थिती या वर्षी होईल. नदीच्याकाठ आज्ही काही लोकांनी स्वत:च्या मालकीची जगा दाखवून प्लॉटीग विक्री करणे सूरू केले आहे. तेथे बांधकाम सूरू झालेले आहे.असे प्रकार किती दिवस होत राहणार आहे प्रशासन ठोस कार्यवाही का करीत नाही.तसेच निर्मल असोशिएटस् च्या संदर्भात मी अनेक वेळा सभागृहात प्रश्न केला परंतू कोणतीही कार्यवाही केलेली नाही. सामनेवाले व्यक्तीला पत्र देवून काम थांबविले म्हणून विभागीय आयूक्त यांना पत्र देवून कळविले परंतू आज्ही तेथे बांधकाम चालू आहे. पूर्ण काम होत आहे त्या इमारतीला रंग देण्याचे काम चालू आहे. तीन मजल्याची परवानगी असतांना पाच मज्ली इमारत झालेली आहे. शिवाई सेवा ट्रस्ट च्या संदर्भात मी प्रश्न करीत आहे त्याचा खूलासा मिळणे अपेक्षीत आहे. दिनांक ३१ मे १९९७ ला सर्वसाधारण सभेत औरंगपूरा येथील नाल्यावरील जगा देण्याचा ठराव पारीत केलेला होता. जी जगा कोणत्या वापरासाठी दिली होती याचा खूलासा मालमत्ताअधिकारी यांनी करावा.

मा. आयुक्त : नदी नाल्या काठी जेअतिक्रमण झालेले आहे जेणे करून पाणी प्रवाहास अडथळा येतो अशा १३५१ लोकांना नोटीसेस दिलेल्या होत्या .या लोकांना हटविण्यापूर्वी महानगरपालिकेकडे जे डिसहाऊस लोकांसाठी आरक्षण आहे. तेथे लेआऊट करण्यासाठी सर्वसाधारण सभेची नाले साफसफाई साठी जे४० लक्ष रूपये आहे ते वर्ग करण्याची परवानगी मागविली होती. हे ४० लक्ष रूपये खर्च करून तेथे लेआऊट करण्यात येतील. नंतर ही रक्कम त्या लोकाकडून वसूल करण्यात येतील.लेऑऊट तयार करून घ्यावा असे सर्वसाधारण सभेचे आदेश होते तेथील लेआऊट तयार करून घेतला नारेगाव येथे ती जगा असून जवळपास ५०० घरे तेथे होतील. लेआऊटची सर्व कॉस्ट काढून सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून ज्यांनी जगा विकत घेतलेली असेल त्याची मालकी सिध्द होत असेल तर त्यांना तेवढीच जगा दिली जईल.

श्री. विनायक पांडे : आज्ही खामनदीवर असलेल्या जगेची लेवल करून प्लॉटीग करणे चालू आहे. त्या संबधी काय कार्यवाही करणार आहे.

मा. आयुक्त : जेमहापालिकेच्या सर्वेमधे आले नाही नवीन आहे त्यांना याचा फायदा देता येणार नाही.

मा.सभापती : उपआयुत महसूल यांना सूचना करण्यात येतेकी प्रशासकीय अधिकारी यांचे माध्यमातून जी स. सदस्यांनी सूचना केलेल्या आहे त्या बाबतीत त्वरीत दखल घेवूनं खामनदीवर जे जगा तयार करून प्लॉटींग करण्याचे काम चालू आहे ते त्वरीत बंद करावे. संबधीतावर कार्यवाही करावी. ज्यांचेकडे रेकॉर्ड नसेल त्यांचे बांधकाम त्वरीत काढण्याची कार्यवाही करावी.

श्री. रेणूकादास वैद्य : माझ्या वार्डात ६ महिन्यापासून अनधिकृत बांधकाम होत आहे. ज्योतीनगर रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे. प्रशासकीय अधिकारी काहीही कार्यवाही करीत नाही. बांधकाम परवानगी घेतली असे उत्तर देण्यात येते. बांधकाम परवानगी

काढली असली तरी रस्त्यावर बांधकाम करता येते का? या संदर्भात अनेक वेळा मी प्रशासकीय अधिकारी यांना लेखी तोंडी सूचना केलेल्या आहे. कार्यवाही होत नाही. ज्योतीनगर रोडवर शहानूरवाडी भागात झालेल्या अतिक्रमणा संदर्भात मा. महापौर यांनी ते काढण्याचे आदेशीत केले होते आजपर्यंत तेथे सदर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केली नाही. जेथे नगरसेवक सांगतात तेथील अतिक्रमण काढले जत नाही जे लोक अधिकृत बांधकाम करतात त्यांना प्रशासकीय विभागातील कर्मचारी जवून त्रास देतात.

मा. सभापती : प्रशासकीय अधिकारी यांनी याची नोंद घेवून कार्यवाही करावी. निर्मल असोशिएटच्या बांधकामा संबधी मुद्या उपस्थित केला संबधीत अधिकारी प्रशासकीय कामा निमित्ताने सभागृहाची परवानगी घेवून न्यायालयात गेलेले आहे. ती संचिका बघून तसे प्रशासनास आदेशीत केले जईल.

श्री. शंशाक विसपूते : गुंठेवारी भत्तगात सूध्दा रस्ते नालेवर जेअनधिकृत बांधकाम होत आहे ते थांबवावे.

मा. सभापती : सर्व सदस्यांना सूचना की प्रशासकीय अधिकारी यांना पत्र देवून माहिती मागवून घ्यावी पत्र देतांना त्याची प्रत माहितीस्तव उपआयुक्त महसूल यांनाही देण्यात यावी. माहिती मिळाली नाही तर मा. आयुक्त यांना प्रत देवून त्यानंतर सर्वसाधारण सभेत असे प्रश्न मांडावे. शिवाई ट्रस्टच्या बांधकामा संदर्भात माहिती उपलब्ध करून मा.न्यायालयात दाखल झालेले आहे. न्यायप्रविष्ट प्रकरणात चर्चा करण्यात येणार नाही. संपूर्ण माहिती मा.न्यायालयात कळविण्यात यावी, प्रशासनास आदेशीत करण्यात येते.

श्री. नासेर नाहदी : न्यायालयात वाद चालू आहे ती बाब वेगळी आहे. मा. आयुक्त यांनी त्याची जबाबदारी समजून काम करावयास पाहिजे मा. आयुक्तांनी त्यांची जबाबदारी पार पाडली नाही बांधकाम परवानगी कमी दिलेली होती बांधकाम प्रत्यक्षात जस्त झालेले आहे. बांधकामाची तळ मजल्याची उंचीही कमी आहे. ज्या उपक्रमासाठी ही जगा दिली तोच वापर होतो का? ही संस्था मुंबईची असून औरंगाबादमध्ये या संस्थेचा काहीही संबध नाही. १९९७ मध्ये प्रस्ताव मंजूर झाला शासनाने मान्यता कशा पध्दतीने दिलेली आहे. त्यानंतर २०.१.२००० मध्ये महानगरपालिका व शिवाई ट्रस्टचा करारनामा झाला. ३० वर्षासाठी जगा दिली १२२० क्वेअर मीटर जगा दिली. यापेक्षा जस्त बांधकाम परवानगीची संचिका सादर केली २४४० चौरस मीटरची परवानगी मागितली, करार झाल्यानूसार जस्तीच्या जगेवर बांधकाम केलेले आहे. दिनांक २८.१०.२००४ रोजी बांधकाम परवानगी दिली .जेनियम व अटी शर्ती घालून दिल्या होत्या त्याचे पालन संस्थेने केलेले नाही. जलनिस्सारण विभागाची परवानगी संस्थेने घेतलेली नाही. परवानगी न घेता सहा. संचालक नगररचना यांनी बांधकाम परवानगी कशी दिली. तळमजल्याची उंची किती मंजूर केलेली होती ज्या प्रमाणे बांधकाम झाले ते योग्य की अयोग्य आहे यामूळे भविष्यात धोका निर्माण होईल किंवा कसे नाला संरक्षीत भिंतीचे काम का करण्यात आले नाही. परवानगी व्यतिरिक्त जस्तीचे बांधकाम कसे झाले. अटी शर्तीचे पालन सदर संस्थेने केले नाही करीत ही बाधंकाम परवानगी रद्द केली पाहिजे चूकीच्या पध्दतीने बांधलेली इमारतीचे बांधकाम सूधारण्यासाठी सूधारीत बांधकाम परवानगी दिनांक ३०.७.२००५ ला सादर करण्यात आलेली आहे. सूधारीत परवानगी रद्द झाली

पाहिजे शिवाई ट्रस्टने २.५ मीटर प्रमाणे बांधकाम करावयास पाहिजेहोते ते नाही. नाथ सूपर मार्केट व शिवाई ट्रस्टच्या इमारतीमधील उंची कमी जस्त आहे. तळमजल्यात दुकानेसाठी परवानगी नसतांना तेथे दुकाने तयार केलेली आहे. मनमानी करून बांधकाम होत आहे तरीही प्रशासन का गप्प आहे. शिवाई ट्रस्ट प्रमाणे अनेक नाल्यावर इमारती बांधण्यासाठी संचिका मंजूरीसाठी मा. आयुक्ताकडे आहेत. त्यांना परवानगी दिलेली नाही शिावाई ट्रस्टला परवानगी कशी दिली. याचा खूलासा व्हावा. न्यायालयाचा निर्णय होईल तो होईल परंतू चूकीचे बांधकाम झालेले आहे ते प्रशासनाने पाडावे. परवानगी नुसार बांधकाम झाले असेल तर रिवाईज परवानगी कशासाठी मागणी करीत आहे. २४४० स्वेअर मीटरवर बांधकाम केले त्याचे भाडे किती होत आहे. सन २००० पासून आजपर्यत किती भाडे वसूल केलेले आहे. एन. ए सेक्यूरीटी डिपॉजेट जमा केले किंवा काय ?

श्री. मिलींद दाभाडे : या प्रकरणासंबधी न्यायालयात वाद चालू आहे. तेथील परीस्थिती काय आहे विधी सल्लागार यांचेकडून खूलासा घेण्यात यावा.कोणते वकील याप्रकरण हाताळत आहे. त्यांचे नाव सभागृहात देण्यात यावे.

विधी सल्लागार : ॲडव्होकेट मंडलिक हे प्रकरण हाताळत आहेत.

सौ. लता दलाल : टेंडर काढल्यानंतर किती दिवसात संबधीत ठेकेदाराने २ टक्के रक्कम भरणे आवशक असते. जे काम करायचे ते त्याची मूदत टेंडर काढल्यापासून गृहीत धरण्यात येते की २ टक्के रक्कम भरणा केल्या नंतर कालावधी गृहीत धरण्यात येतो.कारण माझ्या वार्डात एक काम अर्धवट आहे. एक ठेकेदार एकाच वेळी १० ते १५ कामे घेतात व काही कामे वेळेत करीत नाही.

शहर अभियंता : २ टक्के रक्कम भरण्यासाठी ७ दिवसाची मूदत असते. सात दिवसात भरणा केले नाही तर एक संधी म्हणून पून्हा तीन दिवस दिले जते. नाहीच भरणा केले तर जे दुसऱ्या क्रमांकावर जेआहेत त्यांना काम देण्यात येते.

सौ. लता दलाल : अनेक वार्डातील कामे डिसेंबर जनेवारीपासून होत नाही. केवळ ठेकेदार २ टक्के रक्कम भरणा करीत नाही म्हणून ती कामे सूरू होत नाही. मार्च अखेर पर्यत कामे झालेली नाही. अशा ठेकेदारावर कार्यवाही का करीत नाही.

मा. सभापती : ज्या ठेकेदारानी काम घेतले त्यांनी ८ दिवसात २ टक्के रक्कम भरणा केली नाही तर दुसऱ्या क्रमांकावर ज्याची निविदा असेल त्यांना काम देण्यात यावे व मा.आयूक्ताची परवानगी घेवून संबधीत ठेकेदारावर कार्यवाही करावी.

श्री. मुजीब खान : धोबी घाट भूखंड घोटाळा प्रकरण २००३ बाबत वृत्तपत्रात आलेले आहे. याबाबतीत नगरसेवकावर पदाधिकारी यांचेवर गुन्हा दाखल होणार आहे या बाबतीत प्रशासनाने खूलासा करावा.

मा. सभापती : या प्रकरणामधे चौकशी होणार आहे जे काही निष्पन्न होईल त्यानूसार कार्यवाही होईल. ती माहिती देणे प्रशासनाला शक्य होणार नाही.

श्री. मुजीब खान : चौकशी केव्हा होणार आहे. चौकशी कोण करीत आहे याचा खूलासा करावा.

मा. सभापती : या संबधी शासनाने जी माहिती मागविली आहे ती प्रशासनाने देण्यात यावी.

श्री.शशांक विसपूते : पुंडलिकनगर गारखेडा भागात दरवर्षी टँकरद्वारे पाणी दिले जते फेब्रुवारीनंतर तेथे टँकरची संख्या वाढविण्यात येते, असे असतांना तेथील लोकांनी पैसे भरणा करण्यास तयार आहे एक महिणा झाला पैसे घेतले जत नाही. १२ हजर लिटरचे

टँकर लहान गल्लीमध्ये जत नाही त्यासाठी ५ हजर लिटरचे टँकर मागवावे. म्हणून मागच्या वेळेस मी सूचना केलेली होती. टँकर शेवटच्या गल्लीपर्यंत गेले पाहिजे याचा विचार केला जत नाही. ठेकेदाराच्या सोयीनूसार त्यास काम दिले जते का ?मागिल वर्षी ज्या ठेकेदाराने काम घेतले होते आठ आठ दिवस गॅप पडत असे. पुन्हा त्यांनाच काम देण्यात आले गुरूदत्तनगर भागात एक टँकर चालू होते गेल्या आठ दिवसापासून ते टँकर बंद आहे. काही ठिकाणी चार चार दिवसापासून टँकर नाही. सायकलवर शिवाजेनगर येथून पाणी आणावे लागत आहे. सदर लोकांनी टँकरचे पैसे भरणा केलेले आहे तरीही टँकर द्वारे पाणी दिले जत नाही. लहान टँकर जस्तीत जस्त घेण्यात यावे जेणे करून लहान गल्लीपर्यंत ते जतील व सर्वांना पाणी मिळेल.

सौ. संगिता जधव : माझ्या ही वार्डात हनूमाननगर भागात हीच परीस्थिती आहे. टँकर वेळेवर येत नाही. रात्री बे रात्री टँकर येते. लोकानी पैसे भरणा करून पाणी दिले जत नाही. नवीन टँकर येणार आहे असे सांगण्यात येते. या बाबतीत खूलासा व्हावा.

मा. सभापती : पाणीपूरवठा अधिकारी हे मुंबईला कामानिमित्त गेलेले आहे. शहर अभियंता उपस्थित आहे. सूचना करण्यात येते की स. सदस्या सौ. जधव तसेच श्री.विसपूते यांनी ज्या सूचना केल्या त्याची अमलबजवणी करावी. जेथे मोठे टँकर जत नसेल तेथे लहान टँकर देण्याची कार्यवाही करावी. सर्वे करावा व पाणी वाटपाचे नियोजन करून सर्व जनतेला पाणी कसे मिळेल या संबधी कार्यवाही करावी. इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.२८७ :**

दिनांक ७/२/२००६ (का.प.क्र.२३) व १४/२/२००६ (का.प.क्र.२४) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव**

दिनांक ७/२/२००६ व १४/२/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.२८८ :**

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, (रविवार) जफरगेट आठवडी बाजराची सन २००६-२००७ फी वसुलीचा ठेका देण्यासाठी ज.क्र./मनपा/मामअ/५७५/२००६ दिनांक २-३-२००६ रोजी स्थानिक वर्तमान पत्रात जहीरात प्रसिध्द केली असता व निविदा/बोली दि.९-३-२००६ रोजी दुपारी ०४.०० वाजता मालमत्ता विभागात बोलीस सुरूवात केली असता चार जणांनी भाग घेतला ते खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.शेख कय्युम शेख महेमुद | रू. १८,०००/- प्रती बाजर |
| २. | श्री.संजय भरतुराम चव्हाण | रू. १८,५००/- प्रती बाजर |
| ३. | श्री.साजेद अली मीर हमीद अली | बोली बोललेली नाही |
| ४. | श्री.शकील अहमद जमील अहमद | रू. १७,०००/- प्रती बाजर |

मनपाने जफरगेट आठवडी बाजर फी वसुलीसाठी प्रतीबाजर रू. १६,५००/- आधारभुत किंमत ठेवली असता सर्वात जस्त बोली रक्कम रू.१८,५००/- श्री.संज्य भरतुराम चव्हाण यांनी बोलली आहे. जी मनपाच्या आधारभुत किंमतीपेक्षा जस्त आहे.

तरी श्री.संज्य भरतुराम चव्हाण यांच्याकडून अटी शर्तीनुसार २५% रू. २,४०,५००/- रोख रक्कम व २५% रू. २,४०,५००/- ची बँक गॅरंटी घेऊन संबंधितास दिनांक १-४-२००६ ते ३१-३-२००७ पर्यंत ठेका देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणेब (रविवार) जफरगेट आठवडी बाजराची सन २००६-२००७ फी वसुलीचा ठेका देणेसाठी प्रती बाजर रक्कम रू.१८,५००/-ची सर्वात जस्त बोली बोलणारे श्री.संज्य भरतुराम चव्हाण यांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी शर्तीनुसार दि. १-४-२००६ ते ३१-३-२००७ पर्यंत बाजर फी वसुलीचा ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८९ :**

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, एन-१२, मत्स्य व्यवसाय करण्यासाठी ज.क्र./मनपा/मामअ/६१३/२००६ दिनांक ८-३-२००६ रोजे स्थानिक वर्तमान पत्रात जहीरात देऊन निविदा/बोली दि.१६-३-२००६ रोजे मा.उपआयुक्त (महसुल) व मालमत्ता अधिकारी यांनी बोलीस सुरूवात केली असता बोली मध्ये तीन जगांनी भाग घेतला ते खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.शेख शामद शेख अमीर | रू. ६,६५,०००/- प्रती वर्ष |
| २. | श्री.बन्सीलाल पपनसिंग पंढोरे | रू. ६,६०,०००/- प्रती वर्ष |
| ३. | श्री. फकीरचंद कडुबा दांडगे | रू. २,००,०००/- प्रती वर्ष |

मनपाने डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, एन-१२, मत्स्य व्यवसाय करण्यासाठी आधारभुत किंमत वार्षीक रू.१६,५००/- प्रती वर्षी ठेवली असता श्री.शेख शामद शेख अमीर, चिश्तिया कॉलनी यांनी जस्तीची बोली रू.६,६५,०००/- प्रतीवर्ष बोलली आहे.

सदरील मत्स्य व्यवसाय करण्यासाठी रू. ६,६५,०००/- संबंधिताने बोली बोलली आहे व अनामत रू.१०,०००/- व आधारभुत किंमतीच्या २५% रक्कम रू. १,६६,२५०/- व २५% बँक गॅरंटी रू. १,६६,२५०/- देण्याचे मान्य केले असल्याने व भरलेले असल्यामुळे डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, एन-१२, मत्स्य व्यवसाय करण्यासाठी श्री.शेख शामद शेख अमीर प्रती वर्षी रू. ६,६५,०००/- प्रमाणे दि. ३१-३-२००७ पर्यंत देण्याचे मान्य केल्याने संबंधिताच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : हा विषय स्थगित ठेवण्यात यावा न्यायालयाचे स्थगिती आहे.

विधी सल्लागार : या प्रकरणी तीन चार दिवसापूर्वी न्यायालयात प्रकरण दाखल झालेले असून सुनावणी होईपर्यत जैसे थे चे आदेश आहे स्थगिती नाही. जैसे थेचे आदेशानंतर

अंतिम आदेश झालेले नाही उदया प्रकरण सुनावणीसाठी ठेवण्यात आलेले आहे.मा. न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून मंजूरी देण्यास हरकत नाही.

मा.सभापती : काही बाबी प्रशासनाच्या निदर्शनास आणून देतो की पूर्वी सिडकोकडे हा तलाव होता. ज्या निविदा दिल्या होत्या त्या कमी दराने देण्यात आलेल्या होत्या आजचा जे दर आहे तो मोठया प्रमाणात असून महापालिकेचे उत्पन्न वाढणार आहे. सदर भागाचा चांगला विकास व्हावा तसेच या तलावात जेदुर्गंधी युक्त पाणी येत आहे ते बदं करण्याच्या संदर्भात व चांगले सुशोभिकरण करण्यासाठी या वर्षी बजेटमधे ५० लक्षची तरतूद ठेवलेली आहे. यात स्पर्धा होवून चांगले उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. जैथे थे आदेश मिळविण्यासाठी जर कुणी मदत केली असेल तर मा. आयुक्तांनी त्या संदर्भात चौकशी करावी. अशा प्रकरणात मा. आयुक्त यांनी जतीने लक्ष घालून महापालिकेचे नुकसान होणार नाही. याची दक्षता घ्यावी व मनपाचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यावर कडक कार्यवाही करावी. मा. न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, एन-१२, मत्स्य व्यवसाय करण्यासाठी सर्वात जस्त बोली र.रू.६,६५,०००/- प्रति वर्ष या रक्कमेचे बोलीधारक श्री.शेख शामद शेख अमीर यांना मत्स्य व्यवसाय करण्याचा ठेका दि.३१.३.२००७ पर्यंत देण्यासाठी, प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने विधी सल्लागार यांनी सभागृहात केलेल्या खुलाशानुसार मा.न्यायालयाचे निर्णयास अधीन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९० :**

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००६-२००७ वर्षासाठी संत एकनाथ रंगमंदीर वाहनतळाची फी वसुलीचा ठेका देण्यासाठी ज.क्र./मनपा/मामअ/५७५/२००६ दिनांक २-३-२००६ रोजे स्थानिक वर्तमान पत्रात फी वसूली करण्यासाठी जहीरात दिली असता व दि.९-३-२००६ रोजे निविदा/बोली ठेवली असता बोली मध्ये दोन जणांनी भाग घेतला ते खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.खान ज्हाँगीर खान आदम | रू. ११,०००/- प्रती महिना |
| २. | श्री. शेख उस्मान शेख इसाकोद्यीन | रू. ८,०००/- प्रती महिना |

संत एकनाथ रंग मंदीर वाहनतळासाठी मनपाने आधारभुत किंमत रू.१०,९२१/- ठेवलेली होती श्री.खॉन ज्हॉगीर खॉन आदम यांनी प्रती महिना रू.११,०००/- जस्तीची बोली बोललेली असल्याने व मनपाच्या आधारभुत किंमतीपेक्षा जस्त संबंधीताकडून २५% रोख रू. ३३,०००/- व २५% रू. ३३,०००/- बँक गॅरंटी घेऊन श्री.खॉन ज्हाँगीर खॉन आदम यांना दि. १-४-२००६ ते ३१-३-२००७ पर्यंत ठेका देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर वाहनतळाची फी वसुलीचा ठेका देणेसाठी प्रती महिना रू.११,०००/-ची सर्वात जस्त बोली बोलणारे श्री.खॉन ज्हाँगीर खॉन आदम यांना

प्रस्तावात नमूद केलेल्या अटी शर्तीनुसार दि. १-४-२००६ ते ३१-३-२००७ पर्यंत वाहनतळ फी वसुलीचा ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९१ :**

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००६-२००७ वर्षासाठी पैठणगेट येथील वाहनतळाची फी वसुलीचा ठेका देण्यासाठी ज.क्र./मनपा/मामअ/५७५/२००६ दिनांक २-३-२००६ रोजी वर्तमान पत्रात फी वसूली करण्यासाठी जहीरात दिली असता व दि.१०-३-२००६ रोजी निविदा/बोली ठेवली असता बोली मध्ये तीन जणांनी भाग घेतला ते खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.शेख इरफान इसाकोद्दीन | रू. २,३००/- प्रती महिना |
| २. | श्री. शेख मुसा शेख रहेमान | रू. २,३७८/- प्रती महिना |
| ३. | श्री.सुजत हाश्मी | रू. २,३७८/- प्रती महिना |

मनपाने पैठणगेट येथील वाहनतळ फी वसुलीसाठी प्रतीमहिना रू. २,१७८/- आधारभुत किंमत ठेवली असता सर्वात जस्त बोली रक्कम रू.२,५००/- प्रती महिना श्री.शेख मुसा शेख रहेमान यांनी बोलली आहे. जी मनपाच्या आधारभुत किंमतीपेक्षा जस्त आहे.

तरी श्री.शेख मुसा शेख रहेमान यांच्याकडून अटी शर्तीनुसार २५% रोख रू. ७,५००/- व २५% बँक गॅरंटी रू. ७,५००/- घेऊन संबंधितास दिनांक १-४-२००६ ते ३१-३-२००७ पर्यंत ठेका देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट येथील वाहनतळाची फी वसुलीचा ठेका देणेसाठी प्रती महिना रू.२,५००/-ची सर्वात जस्त बोली बोलणारे श्री.शेख मुसा शेख रहेमान यांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी शर्तीनुसार दि. १-४-२००६ ते ३१-३-२००७ पर्यंत वाहनतळ फी वसुलीचा ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९२ :**

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, एन-१२, वाहनतळ व प्रवेश शुल्क फी वसुली करण्यासाठी ज.क्र./मनपा/मामअ दिनांक ८-३-२००६ रोजी स्थानिक वर्तमान पत्रात जहीरात देऊन निविदा/बोली दि.१६-३-२००६ रोजी मा.उपआयुक्त (महसुल) व मालमत्ता अधिकारी यांनी बोलीस सुरूवात केली असता बोली मध्ये तीन जणांनी भाग घेतला ते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १. | श्री. फकीरचंद कडुबा दांडगे |
| २. | खॉन ज्हागीर आदम |
| ३. | पठाण जवेदखान अजेजखान |

मनपाने डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, एन-१२, वाहनतळ व प्रवेश शुल्क फी वसुली साठी आधारभुत किंमत प्रतीमाह रू.५,०००/- ठेवली असता श्री.फकीरचंद कडुबा दांडगे यांनी जस्तीची बोली रू.५,१००/- प्रतीवर्ष बोललेली आहे.

सदरील वाहनतळ व प्रवेश शुल्क फी वसूलीसाठी रू.५,१००/- संबंधिताने अनामत रू. १०,०००/- व आधारभुत किंमतीच्या २५% रक्कम रू. १५,३००/- व २५% बँक गॅरंटी रू. १५,३००/- देण्याचे मान्य केले असल्याने व भरलेले असल्यामुळे डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, एन-१२, वाहनतळ व प्रवेश शुल्क फी वसुलीसाठी श्री.फकीरचंद कडूबा दांडगे प्रती वर्षी रू. ५,१००/- प्रमाणे दि. ३१-३-२००७ पर्यंत देण्याचे मान्य केल्याने संबंधिताच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, एन-१२, वाहनतळ व प्रवेश शुल्क फी वसुली ठेका देणेसाठी प्रती वर्ष रू.५,१००/-ची सर्वात जस्त बोली बोलणारे श्री.फकीरचंद कडूबा दांडगे यांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी शर्तीनुसार दि.३१-३-२००७ पर्यंत वाहनतळ व प्रवेश शुल्क फी वसुलीचा ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.२९३ :</u>**

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरात महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध समाजमंदीर, व्यायामशाळा, सभागृह व मंगल कार्यालय व बहुउद्येशीय हॉल अशा इमारती आहेत. या पैकी काही इमारती मा.खासदार व मा.आमदार यांच्या निधीतुन बांधण्यात आलेल्या आहेत. सद्यपरिस्थिती यातील काही इमारती मनपाच्या विविध कार्यालयाच्या ताब्यात आहेत. उदा. वॉर्ड अ ते फ, प्रकल्प विभाग, क्रिडा विभाग, शिक्षण विभाग यांच्या ताब्यात आहेत. काही माजे नगरसेवक तसेच खाजगी व्यक्तीच्या / संस्थेच्या ताब्यात आहेत. त्यामुळे मनपाच्या मालमत्ता विभागाने या इमारतीवर सुरक्षा व देखभालीसाठी कोणतेही व्यवस्था केलेली नाही. या इमारती ज्यांच्या ताब्यात आहे ते लोक काही विशिष्ट व्यक्तीसाठी किंवा कार्यासाठी त्याचा वापर विशिष्ट कालावधी करताच करतांना आढळले. तसेच मनपा याबाबत कोणतेही शुल्क/भाडे आकारत नसल्यामुळे या इमारतीची दुराव्यवस्था झालेली आहे. या इमारतींना किरकोळ दुरूस्ती करून तातडीने भाड्याने देणे अत्यंत आवश्यक आहे. या इमारती भाड्याने देतांना या इमारतीचे भाडे नियमाप्रमाणे आकारून व अनामत रक्कम ही स्विकारणे योग्य होईल. जेणे करून नोंदणीकृत संस्थेस अथवा व्यक्तीस इमारत भाडेतत्वावर दिल्यानंतर मनपास उत्पन्न मिळु शकेल.

या इमारतीपैकी ज्या इमारती मा.खासदार व मा.आमदार यांच्या निधीतुन बांधली असल्यास अशा इमारती धर्मादा संस्थेस (नोंदणीकृत) त्यास नियमाप्रमाणे भाडे जेभाडे समिती ठरवेल त्यानुसार आकारून संबंधित मा.खासदार व मा.आमदार हे ज्या संस्थेची शिफारस करतील, त्या संस्थेस / व्यक्तीस प्रथम प्राधान्याने देण्यात योग्य होईल.

ज्या इमारतीत मनपा फंडातुन बांधले आहे, त्या इमारतीचे भाडे ठरवुन आयुक्त द्वारा संबंधित सोबत जेडलेले तक्त्यातील इमारत नियमानुसार येणाऱ्या भाड्याने व अनामत रक्कमेचा व इतर इमारत शहराच्या भागात / रेखांकनात असेल तेथील नागरीक कृती समिती अथवा रेखांकनातील नागरीकांचे ना हरकत प्रमाणपत्र आणण्याच्या अटीवर देय करणे योग्य होईल.

जेणे करून यातुन मनपातर्फे जेथे जनतेसाठी प्रस्ताव राबविण्यात येत असतील उदा. आरोग्य केंद्र वाचनालय, बालवाडी इत्यादी तर अशा इमारती वगळुन इतर इमारती निविदा / बोली अन्वये भाड्याने देण्यात येतील. इमारती भाड्याने दिल्यावर सदर भाडेपट्टा कालवधीतील संपुर्ण देखभाल

दुरूस्ती, विद्युत, पाणी, व्यवस्थापन खर्च हा संबंधित संस्थेला / व्यक्तीस करावा लागेल. मनपा ह्या खर्चाचा मोबदला देणार नाही. या शिवाय मनपाच्या नेहमीच्या अटी शर्तीवर स्वखर्चाने करारनामा करणे संबंधित संस्था / व्यक्तीस करावा लागेल.

तरी वरील प्रमाणे औरंगाबाद शहरातील मनपाच्या इमारती भाडेतत्वाने खाजगी संस्था / व्यक्तींना देणे बाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. या इमारतींना भाडे शासन नियमाप्रमाणे भाडे समिती ठरविल त्याप्रमाणे आकारून कार्यवाही करून करण्याची अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका यांना देण्यात यावे. भाडे समितीने ठरविलेल्या भाडे संबंधी वाद झाल्यास सदर भाडे अंतिम ठरविणे बाबत मा.स्थायी समितीस संपुर्ण अधिकार राहील. ही संपुर्ण कार्यवाही येत्या तीन महिन्यात पुर्ण करणे प्रशासनावर बंधनकारक राहील.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील म.न.पा.च्या इमारती भाडेतत्वाने खाजगी संस्था/ व्यक्तींना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. या इमारतींना शासन नियमाप्रमाणे भाडे समिती ठरविल त्याप्रमाणे भाडे आकारून कार्यवाही करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका यांना प्रदान करण्यास देखील सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बोल्ट तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पासाठी गठीत केलेल्या बोल्ट समितीच्या १४.१०.२००५ रोजीचे बैठकीत सिध्दार्थ उद्यान येथे बोल्ट तत्वावर पुढील विकास कामे हाती घ्यावीत. वाहनतळ, तात्पुरते स्टॉल, टेरेस रेस्टॉरंट, कारंजे व अत्याधुनिक उपहारगृह, मनोरंजन केंद्रासाठी डॅशींग कारसह आधुनिक खेळणी बसविणे ही उद्यान विकासाची कामे करण्याचे निर्देश प्राप्त आहेत.

उपरोक्त निर्देशास अधिन राहून बोल्ट तत्वावर सिध्दार्थ उद्यान विकसित करणेसाठी निविदा कार्यवाहीस मा.आयुक्त यांची दि.६.१२.२००५ अन्वये मान्यता प्राप्त आहे. बोल्ट तत्वावर सिध्दार्थ उद्यान विकसित करण्याचे रू.३९८.०० लक्ष किंमतीचे निविदे अधिन प्रामुख्याने पुढील विकास कामे अंतर्भूत आहेत. सिध्दार्थ उद्यान येथील एकतीस एकर क्षेत्रातील मुख्य रस्त्यास लागून असलेले क्षेत्रात पुढील विकास कामे करणे. या क्षेत्रापैकी मनपासाठी वाहनतळ (५७०८ चौ.मी.) बांधणे, अद्यावत प्रवेशद्वार (६० चौ.मी.) बांधणे आणि विकसकाचे हिश्श्यात २३७३ चौ.मी.क्षेत्रावर दुकान केंद्र व अद्यावत उपहारगृह बांधणे व ९३५ चौ.मी.क्षेत्रात मनोरंजनासाठी अद्यावत खेळणी बसविणे याप्रमाणे क्षेत्र विकासाची कामे बोल्ट निविदा अधिन पूर्ण करावयाची आहेत. वरील क्षेत्र विकासातील वाहनतळ, प्रवेशद्वार या मनपास मिळणाऱ्या बांधीव क्षेत्राशिवाय म.न.पा.कडून विकसकास ९९ वर्षे भाडेतत्वावर द्यावयाचे क्षेत्रापोटी विकसकाने म.न.पा.स रू.६० प्रति चौ.मी.प्रतिवर्ष दराने लीजरेंट आणि विना परतावा प्रिमीयम या मनपासाठी जमेच्या बाजू राहणार आहेत.

वर नमूदप्रमाणे बोल्ट तत्वावर हाती घेतलेल्या प्रकल्पाची जहिर निविदा सूचना (पहिली वेळ) दि.९.१२.२००५ रोजे राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदा स्विकृतीचे शेवटचे दिनांकापर्यंत फक्त एकच निविदा प्राप्त झाली. सदर निविदाचे तांत्रिक लिफाफा

छाननी दरम्यान सदर निविदा पात्रता निकष पूर्तता करीत नसल्याचे आढळले. त्यामुळे सदर निविदा नाकारून फेरनिविदा कार्यवाहीस मा.आयुक्तांनी दि.२१.१.२००६ अन्वये मान्यता दिली आहे. फेरनिविदा कार्यवाही अंतर्गत सदर प्रकल्पासाठी जहिर निविदा सूचना (दुसरी वेळ) राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात दि.४.२.२००६ अन्वये प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदा स्विकृतीचे शेवटचे दिनांकापर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. तीन्ही निविदा पात्रता निकष पूर्तता करीत असल्याने निविदाचे वाणिज्य देकार दराचा लिफाफा उघडण्यात आला व त्याची छाननी करण्यात आली. प्राप्त झालेल्या तीन्ही निविदाचे वाणिज्य देकार दर पुढे नमूद प्रमाणे आहेत.

१. मे.श्रीप्रकाश डेव्हलपर्स (अँड जेव्ही) देकार दर रू.३९.०० लक्ष प्रथम उच्च दर

२. मे.तेजस कन्स्ट्रक्शन (अँड जेव्ही) देकार दर रू.२५.९२ लक्ष

३. मे.पृथ्वी इंटरप्राईजेस (अँड जेव्ही) देकार दर रू.११.०० लक्ष

वर नमूद प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या मे.श्रीप्रकाश डेव्हलपर्स अँड जेव्ही यांचा देकार दर रू.३९.०० लक्ष (रूपये एकोणचाळीस लक्ष) एवढा व उच्चतम आहे.

सदर विकसक यांनी निविदेसवोबत दाखल केलेल्या नकाशाचे व देकार दराचे छाननी करून त्याबाबतचा छाननी करून फीजेबीलीटी अहवाल प्रकल्पाचे पी.एम.सी. यांनी कार्यालयास दाखल केला आहे. त्यानुसार निविदा कार्यवाहीत प्राप्त झालेली उच्चतम देकार दराची मे.श्रीप्रकाश डेव्हलपर्स अँड जेव्ही यांचा वाणिज्य देकार दर रू.३९.०० लक्ष (एकोणचाळीस लक्ष रूपये) आहे. हा दर महानगरपालिकेस लाभदायी (इशशिषळलळरश्र) आहे. तरी त्यानुसार सदर बोल्ट प्रकल्पासाठी मे.श्रीप्रकाश डेव्हलपर्स अँड जेव्ही यांची रू.३९.०० लक्ष (एकोणचाळीस लक्ष रूपये) देकार दराची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीनंतर मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ प्रस्ताव ठेवण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे बोल्ट तत्वावर वाहनतळ, तात्पुरते स्टॉल, टेरेस रेस्टॉरंट, कारंजे व अत्याधुनिक उपहारगृह, मनोरंजन केंद्रासाठी डॅशींग कारसह आधुनिक खेळणी बसविणे ही उद्यान विकासाची कामे करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी उच्चतम देकार दराची मे. श्रीप्रकाश डेव्हलपर्स अँड जेव्ही यांची वाणिज्य देकार दर रू.३९.०० लक्ष (एकोणचाळीस लक्ष रूपये) इतक्या देकार दराची सदर बोल्ट प्रकल्पासाठी ९९ वर्षाच्या भाडेपट्ट्याच्या करारावर प्रकल्प विकसित करणेसाठी निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.२९५ :</u>**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बोल्ट तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पासाठी गठीत केलेल्या बोल्ट समितीच्या १४.१०.२००५ रोजेचे बैठकीत शहानुरवाडी येथील स.नं.१२ आरक्षण क्र.२६२ आठवडी बाजर संकुलाचे उभारणीसाठी निविदा कार्यवाहीचे निर्देश प्राप्त आहेत.

सदरहु आठवडी बाजर संकुल आरक्षण क्षेत्राची जगा महानगरपालिकेच्या ताब्यात घेतलेली आहे. उपरोक्त मान्यतेस अधिन राहुन सदरहु आठवडी बाजर संकुल प्रकल्प ९९ वर्षे भाडेतत्वावर (विकसक हिश्श्यातील भाग) देवून आनुषंगिक निविदा कार्यवाहीस मा.आयुक्त यांची दि.६.१२.२००५ अन्वये मान्यता प्राप्त आहे. बोल्ट तत्वावर आठवडी बाजर संकुल विकसित

करण्याचे रू.५५९.०० लक्ष किंमतीचे निविदा कामा अधिन पुढील प्रमाणे विकास कामे समाविष्ट आहेत. प्रकल्पाचे एकूण क्षेत्र (१५८८१ चौ.मी.+ १०००० चौ.मी.नाला क्षेत्र) यातून मनपासाठी १०००० चौ.मी. क्षेत्रावर आठवडी बाजरसाठी कॉंक्रीट अस्तरीकरण पृष्ठभागासह विकास करणे, मनपासाठी ४० दुकानांचे बांधीव क्षेत्र २४०.०० चौ.मी., पार्कींग आणि डेव्हलपमेंट आणि प्रकल्प स्थळातून जणाऱ्या नाल्याचे रिअलायनींग करून चॅनलाईजेंग करणे ही कामे मनपाचे हिश्श्यात राहतील. त्याशिवाय विकसकास द्यावयाचे क्षेत्रासाठी लीजरेंट रू.६०/- प्रति चौ.मी. प्रतिवर्ष दराने विकसकाचे क्षेत्रापासूनचे भाडे आणि विना परतावा प्रिमीयम या मनपाच्या जमेच्या बाजु राहतील. या बदली म.न.पा.कडून विकसकास ५८८१ चौ.मी. एवढे चटईक्षेत्र ९९ वर्षे भाडे करारान्वये द्यावे लागणार आहे.

वर नमूदप्रमाणे बोल्ट तत्वावरील प्रकल्पासाठी जहिर निविदा सूचना (पहिली वेळ) दि.९.१२.२००५ रोजे राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदा कार्यवाही दरम्यान निविदा स्विकृतीचे शेवटचे दिनांका पर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदाचे तांत्रिक लिफाफा छानननी दरम्यान तीन्ही निविदा पात्रता निकषांची पुर्तता करीत नसल्याने सदर तीन्ही निविदा नाकारण्यास व फेरनिविदा कार्यवाहीस मा.आयुक्त यांची दि.२१.१.२००६ अन्वये मान्यता प्राप्त आहे. त्या अनुसार सदर प्रकल्पासाठी जहिर निविदा सूचना (द्वितीय वेळ) राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात दि.४.२.२००६ अन्वये प्रसिध्द करण्यात आली.

सदर निविदा स्विकृतीचे शेवटचे दि.२८.२.२००६ पर्यंत एकुण चार निविदा प्राप्त झाल्या. सदर चार निविदाचे तांत्रिक लिफाफा छाननीनंतर मे.डी.एम.कन्स्ट्रक्शन्स यांची निविदा पात्रता निकष पूर्तता करीत नसल्याने सदर निविदा नाकारण्यात आली आणि पुढे नमूद प्रमाणे तीन निविदाचा वाणिज्य देकार दर लिफाफा उघडण्यात आला व छाननी केली. त्यानुसार तीन्ही निविदाचे वाणिज्य देकार दर पुढे नमूद प्रमाणे आहेत.

१. मे.पृथ्वी इंटरप्राईजेस (अँड जेव्ही) दर रू.७९.०० लक्ष प्रथम उच्च

२. मे.अप्लाइड कन्स्ट्रक्शन्स (अँड जेव्ही) दर रू.७२.०० लक्ष

३. मे.तेजस कन्स्ट्रक्शन्स (अँड जेव्ही) दर रू.२५.०० लक्ष

वर नमूद प्रमाणे प्राप्त निविदाचे वाणिज्य देकार दरापैकी मे.पृथ्वी इंटरप्राईजेस (अँड जेव्ही) यांचा देकार दर रू.७९.०० लक्ष (एकोणऐंशी लक्ष रूपये फक्त) हा तुलनात्मकदृष्ट्या उच्चतम आहे.

सदर विकसक यांनी निविदा सोबत दाखल केलेल्या नकाशा व देकार दराचे छाननी करून त्याबाबतचा फीजेबीलीटी अहवाल प्रकल्पाचे पी.एम.सी. यांनी कार्यालयास दाखल केला आहे. त्यानुसार निविदा कार्यवाहीत प्राप्त झालेली उच्चतम देकार दराची मे.पृथ्वी इंटरप्राईजेस (अँड जेव्ही) यांचा वाणिज्य देकार रू.७९.०० लक्ष (एकोणऐंशी लक्ष) हा दर महानगरपालिकेचे दृष्टीने लाभदायी (इशशिषळलळरश्र) आहे. तरी त्यानुसार सदर बोल्ट प्रकल्पासाठीची मे.पृथ्वी इंटरप्रायजेस अँड जेव्ही यांची रू.७९.०० लक्ष (एकोणऐंशी लक्ष रूपये) देकार दराची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीनंतर मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ प्रस्ताव ठेवण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी येथील स.नं.१२, आरक्षण क्र.२६२ आठवडी बाजर संकुलाचे उभारणीसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी उच्चतम देकार दराची मे.पृथ्वी इंटरप्राईजेस

(अँड जेव्ही) यांची वाणिज्य देकार रू.७९.०० लक्ष (एकोणऐंशी लक्ष) इतक्या देकार दराची सदर बोल्ट प्रकल्पासाठीची निविदा व ९९ वर्षाच्या भाडेपट्ट्याच्या करारावर प्रकल्प विकसित करणेसाठी स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.२९६ :</u>**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बी.ओ.एल.टी.तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पासाठी गठीत केलेल्या बी.ओ.एल.टी.समितीची, रेल्वे स्टेशन महापौर बंगल्या जवळील न.भू.क्र.१९१४९ वरील व्यापारी संकुल व प्रशासकीय इमारत उभारणीसाठी निविदा कार्यवाहीचे निर्देश प्राप्त आहेत.

सदर न.भू.क्र.१९१४९ ही महानगरपालिकेच्या मालकीची ११०५९.५१ चौ.मी. क्षेत्र महापौर बंगल्यासहीत असून सदर ठिकाणी प्रशासकीय इमारत व व्यापारी संकुल क्षेत्र ६३३२.६२ चौ.मी. बांधणेसाठी व बांधीव क्षेत्र ५७९२.६२ चौ.मी. विकसक यांना ९९ वर्षाच्या भाडे तत्वावर (विकास हिश्श्यातील भाग) देणेसाठी निविदा काढण्यासाठी निर्देश असून बोल्ट तत्वावरील प्रकल्पासाठी जहीर निविदा सूचना दि.४.२.२००६ रोजे राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. दि.३.३.२००६ रोजे निविदापूर्व बैठक (ज्ञीशलळव) मा.आयुक्त यांचे दालनात घेण्यात आली. निविदापूर्व बैठकीत सदर निविदा अनुषंगाने विकसक यांचेसाठी लागू असलेली पात्रता निकष विकसक यांना समजवून सांगितले. निविदा स्वीकृतीची शेवटची तारीख दि.७.३.२००६ होती.

निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांकापर्यंत सदर प्रकल्पासाठी एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या व त्या पुढे नमूद विकसक यांनी दाखल केल्या.

१. मे. औरंगाबाद बिल्डर्स व डेव्हलपर्स

२. मे.तेजस कन्स्ट्रक्शन (व जेव्ही.)

३. मे. शलाका इंजिनियर्स

निविदा तीन लिफाफा पध्दतीनुसार मागविण्यात आल्या असून प्राप्त निविदा छाननीसाठी लिफाफा उघडण्यात आला असता मे.शलाका इंजिनियर्स यांची निविदा पात्रता निकष पूर्तता होत नसल्याने नाकारण्यात आली. इतर दोन निविदाची निविदा प्रक्रिया पध्दतीनुसार लिफाफा क्र.१ ची छाननी करण्यात आली व पात्रता निकष पूर्ण होणाऱ्या दोन निविदा पुढील प्रमाणे आहे.

१) मे.औरंगाबाद बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, २) मे.तेजस कन्स्ट्रक्शन (व जेव्ही.) यांचे लिफाफा क्र.२ उघडण्यात आले व छाननी अंती पात्र असल्याने लिफाफा क्र.३ उघडण्यात आला. त्यांचे दर पुढे नमूद प्रमाणे आहेत.

१. मे.औरंगाबाद बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रिमीयम रू.१,७१,१७,११७.११

२. मे. तेजस कन्स्ट्रक्शन (अँड जेव्ही.) प्रिमीयम रू.२,७०,९२,०९२.००

उपरोक्त प्रमाणे प्राप्त देकार दरापैकी मे.तेजस कन्स्ट्रक्शन अँड जेव्ही. यांचा दर तुलनात्मकदृष्ट्या उच्चतम प्राप्त आहे. सदर प्रकल्पाचे भुखंड क्षेत्र ११०५९.५१ चौ.मी. असून देय चटई क्षेत्र ७६४४.९४ चौ.मी. एवढे आहे. त्यापैकी विकसक यांना ९९ वर्षे भाडे तत्वावर द्यावयाचे बांधीव क्षेत्र ५७९२.६२ चौ.मी. एवढे आहे. सदर बांधीव क्षेत्रासाठी ९९ वर्षासाठी भाडेपट्टा दर

रू.१०/- प्रति चौ.मी. प्रतिमाह या प्रमाणे राहणार आहे. आणि विकसकाकडून मनपास बांधुन द्यावयाचे क्षेत्र ५४० चौ.मी. (डींळश्रीं २६५.००चौ.मी. क्षेत्रासह)एवढे आहे. याशिवाय भूखंड विकासा अधिन रस्ते, पथदिवे, जलवाहिनी, जलनि:सारण वाहिनी, खुली जगा विकास, पार्कींग विकास ही कामे विकसकाचे खर्चाने करणे विकसकास बंधनकारक राहणार आहे.

तरी वरील प्रमाणे मे.तेजस कन्स्ट्रक्शन अँड जेव्ही. यांचे उच्चतम देकार दर रू.२,७०,९२,०९२/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे.तेजस कन्स्ट्रक्शन यांची सदर बोल्ट प्रकल्पासाठीची निविदा व ९९ वर्षाच्या भाडेपट्ट्याच्या करारावर (ङशरीश ठशपीं) प्रकल्प विकसित करणेसाठी निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीनंतर मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव व विचारार्थ प्रस्ताव ठेवण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे स्टेशन महापौर बंगल्या जवळील न.भू.क्र.१९१४९ वरील व्यापारी संकुल व प्रशासकीय इमारत बोल्ट तत्वावर उभारणीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी उच्चतम देकार दर रू.२,७०,९२,०९२/- ची मे.तेजस कन्स्ट्रक्शन यांची सदर बोल्ट प्रकल्पासाठीची निविदा व ९९ वर्षाच्या भाडेपट्ट्याच्या करारावर (ङशरीश ठशपीं) प्रकल्प विकसित करणेसाठी निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र.२९७ :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत विविध विकास कामे, साहित्यांचा, रसायनांचा पुरवठा हा निविदा प्रक्रियेतून होतो. त्यासाठी विविध विभागांकडून आवश्यक ती अंदाजपत्रके तयार केली जातात. त्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर निविदा विभागाकडून स्थानिक तसेच राज्य पातळीवरील (कामाच्या स्वरुपानूसार) वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्दी केली जाते. व त्यानुसार प्राप्त निविदांवर पुढील कार्यवाही केली जाते. यासाठी महानगरपालिकेचे स्वतंत्र निविदा विभाग आहे. निविदा पुस्तके व सुचना तयार करणे, वर्तमानपत्रात जाहीर करणे, निविदा स्विकारणे, आवश्यक असल्यास निविदा पूर्व बैठक बोलावणे इत्यादी कामे सद्यस्थितीत महानगरपालिकेला करावी लागतात.

दिनांक २२.०३.२००६ रोजी मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि. या कंपनीचे संचालक श्री विजय ढवंगळे यांनी औरंगाबाद महानगरपालिकेस भेट देऊन मा.आयुक्त यांचेशी चर्चा केली व निविदा विभागाचे संगणकीकरण करुन E-Tendering सेवा पुरविण्याबाबत प्रस्ताव दिला आहे. हा प्रस्ताव बांधा-वापरा-हस्तांतरण करा या तत्वावर असून, दहा वर्षांनंतर महानगरपालिकेस हस्तांतरीत होणार आहे.

**<u>प्रस्तावात खालील बाबींचा समावेश आहे</u>**

१) निविदा विभागाचे संगणकीकरण करण्यासाठी सॉफ्टवेअर तयार करणे.
२) संबंधीत विभागाशी संपर्क करुन निविदा पुस्तक (Soft copy) तयार करणे.
३) निविदा पुस्तकास (Hard Copy) विभाग प्रमुखाकडून स्विकृती मिळविणे.
४) निविदा सुचना तयार करणे.
५) वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करणे.
६) महानगरपालिकेच्या वेब साईट वर निविदा सुचना प्रसिध्द करणे.
७) निविदा प्रक्रिया खालील प्रमाणे राहील.
अ) तीन लिफाफे पध्दती (मुख्य लिफाफ्यामध्ये, लिफाफा नं.१ ज्यात तांत्रिक बाबींचा समावेश असेल, व बोली लिफाफा नं.२)
ब) तीन ही लिफाफे निविदा पुस्तका सोबत देण्यात येतील.

८) निविदा विक्री करणे.

९) निविदा स्विकृत करणे.

१०) निविदा उघडणे. तांत्रिक व आर्थिक क्षमतेची तपासणी करणे, तुलनात्मक तक्ता करुन महानगरपालिकेच्या सक्षम अधिकाऱ्यांना सादर करणे.

११) निविदा धारकांना निविदा उघडण्याची तारीख कळविणे.

१२) महानगरपालिका अधिकारी व निविदाधारक यांचे समोर निविदा उघडणे.

१३) निविदा उघडल्यानंतर त्याबाबतचा अहवाल सादर करणे.

१४) मुख्य इमारतीत निविदा विभाग स्थापन करणे, त्यासाठी लागणारी सामुग्री (Hard ware and soft ware) पुरविणे.

१५) निविदा विभाग चालविणे, यंत्र सामुग्रीची देखभाल दुरुस्ती करणे.

१६) निविदा पूर्व बैठकीचे आयोजन करणे, संबंधीत निविदा धारकांना कळविणे, त्यांच्याकडून माहिती घेणे.

१७) कालावधी संपल्यानंतर सर्व विभाग व सामुग्री महानगरपालिकेस हस्तांतरण करणे, आवश्यकता असल्यास महानगरपालिका कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.

१८) निविदा विभाग चालविण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे तसेच सदरील कर्मचारी हे महानगरपालिका सेवेत कायम स्वरुपी राहण्याबाबत दावा करणार नाही याचे हमीपत्र देणे.

उपरोक्त कामासाठी मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि. कंपनी यांनी प्रत्येक निविदा पुस्तकाच्या विक्री पोटी रुपये १६०/- असा दर दिलेला आहे. पुणे महानगरपालिकेने मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि. यांना महानगरपालिका अंतर्गत निविदा विभाग संगणकीकरण व E-Tendering साठी B.O.T. तत्वावर रुपये १६०/- प्रति निविदा पुस्तक अशा दरानुसार कार्यादेश दिलेले आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेच्या ठेकेदारांची जोडणी सुरु केल्यास हे काम पण एजेंन्सी याच दरात करतील.

औरंगाबाद महानगरपालिकेने अद्यायवत संगणकीकृत निविदा विभाग उघडल्यास खालील फायदे अपेक्षीत आहे.

१) निविदा विभागातील कर्मचारी संख्येत कपात होईल.

२) निविदा पुस्तीका, निविदा सुचना तयार करणे, तुलनात्मक तक्ता तयार करणे, निविदा उघडणे यासाठी लागणारा वेळ वाचेल.

३) महानगरपालिकेच्या वेब साईटवर निविदा प्रसिध्द होत असल्याने विस्तृत क्षेत्रात त्यास प्रसिध्दी मिळून स्पर्धात्मक दर प्राप्त होतील.

४) निविदा विभागाचे संगणकीकरण होऊन सर्व माहिती सुटसूटीत स्वरुपात मिळेल.

५) सदरचा प्रस्ताव हा B.O.T. तत्वावर असल्याने महानगरपालिकेचा कुठलाही खर्च होणार नाही. कारण संबंधीतांना द्यावयाचे रुपये १६०/- प्रति निविदा ही रक्कम निविदा खरेदी करणाऱ्यांकडून आकारण्यात येईल.

करीता पुणे महानगरपालिकेने तयार केलेल्या अटी व शर्तीनुसार व त्याच धर्तीवर मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेकडून औरंगाबाद महानगरपालिकेच्या निविदा विभागाचे संगणकीकरण व E-Tendering चे काम B.O.T. तत्वावर देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे समोर विचारार्थ तथा निर्णयास्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या निविदा विभागाचे संगणकीकरण करून ई-टेंडरींग सेवा देण्याकरीता पुणे महानगरपालिकेने तयार केलेले व प्रस्तावातील नमूद अटी शर्तीनुसार मे.ढवंगाळे इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेस बी.ओ.टी.तत्वावर (बांधा-वापरा-हस्तांतर करा) देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९८ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संपत्ती खरेदी विक्री व्यवहार पंजीकृत केल्यानंतर शासनाच्या विविध विभागांमध्ये नामांतर करणे आवश्यक आहे. परंतु वेळे अभावी किंवा पूर्ण माहिती नसल्याकारणांने अथवा नामांतर प्रक्रियेची संपूर्ण कल्पना नसल्याने नागरिक स्वत:हून नामांतर करायला पुढे येत नाही. आवश्यक कागदपत्रे कोणकोणती आहे या गोष्टीची नागरिकांना जाणीव नसते. सध्या नामांतरणाच्या प्रक्रियेला बराच कालावधी लागत असल्यामुळे सामान्य लोक सरळसरळ मध्यथांमार्फत नामांतर प्रक्रिया करीत असतात.

या सर्व गोष्टीनां आळा व नामांतर प्रक्रियेत पारदर्शीता आणण्याच्या दृष्टीने On-line-Mutation ही संकल्पना अस्तित्वात आली आहे. भूमी अभिलेख विभागाने शहरासाठी सिटी सर्व्हे कार्यालय व ग्रामीण भागात सातबाराचे On Line Mutation बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वावर खाजगी संस्थे मार्फत सॉफ्टवेअर तयार करुन नामांतरणाची प्रक्रिया संगणकाद्वारे ऑन लाईन, पारदर्शी व खरेदी विक्री पंजीकरणाच्या वेळीच बंधनकारक करण्यात येणार आहे. याच प्रकल्पाच्या धर्तीवर आता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालय भूमी अभिलेख विभागाचे व महानगरपालिकेचे कार्यालय सुध्दा On-line-Mutation सुरु करीत आहे.

याबाबत मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि., नागपूर यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार On-line-Mutation ची प्रक्रिया दुय्यम निबंधक कार्यालयात (खरेदी विक्री) व्यवहार आटोपताच विकसीत केलेल्या सॉफ्टवेअर द्वारे नामांतरणाला आवश्यक असणारी कागदपत्रे तयार होतात. खरेदी विक्री व्यवहार पंजीबंध करण्याचे वेळी खरेदीदार, विक्रेता, संबंधीत वारसदार हे सर्व लोक उपस्थित असतात त्याचवेळी आवश्यक त्या लोकांच्या सह्या व फोटो सुध्दा अर्जावर घेता येतात. शिवाय त्यांना कायदेशीर नोटीस सुध्दा बजावता येते. प्रत्येक दिवशीच्या जमा झालेल्या संपूर्ण केसेस त्याच दिवशी संबंधीत विभागात जमा करण्यात येतात.

## <u>ऑनलाईन नामांतर सुरु केल्यास</u>

१) कुठलाही अर्ज न करताच नामांतरणासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे उपलब्ध होतात. एकाच ठिकाणी अर्ज व कागदपत्रे जमा करण्याची सोय उपलब्ध होते शिवाय उपस्थित वारसांना त्याची कल्पना सुध्दा येते.

२) पक्षकाराचा वेळ वाचतो, मध्यस्था पासून सुटका होते व ठरावीक शुल्क भरण्याची सोय असल्याने आर्थिक भूर्दड बसत नाही.

३) नामांतरणाची प्रक्रिया जी फार उशीरा सुरु व्हायची, ती आता व्यवहार सुरु झाल्याबरोबर ताबडतोब सुरु होईल.

४) खरेदी विक्री व्यवहार पंजीबंध्द झाल्यानंतर नामांतरणाची प्रक्रिया निर्धारीत वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल.

५) आज पर्यंत जे व्यवहार पंजीबध्द झाले व ज्यांचे नामांतरण झाले नाही अशा साठी सुध्दा महानगरपालिका कार्यालयात एक खिडकी उभारण्यात येईल. तेथे लोकांना कुठल्याही मध्यस्थाकडे जाण्याऐवजी सरळसेवा माहिती उपलब्ध होणार आहे.

६) नामांतरणाची संपूर्ण कागदपत्रे व अर्ज एकाच विहीत नमून्यात असल्याने अधिकाऱ्यांच्या कामात सुसूत्रता येईल.

७) या प्रक्रियेमध्ये लोकांकडून नामांतरणासाठीची कागदपत्रे व शुल्काची रक्कम जमा करण्यासाठी महानगरपालिका कार्यालयाला कुठलेही मनुष्यबळ खर्च करावे लागणार नाही.

८) खरेदीदार व विक्रेता यांचे फोटो अर्जावरच देण्यात येणार असल्याने, बनावटी प्रकाराला आळा बसेल.

९) हा प्रकल्प बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या धर्तीवर असल्याने महानगरपालिकेला कुठलेही आर्थिक गुंतवणूक न करता विभागाचे संगणीकरणाचे उष्टीष्ट साध्य होणार आहे.

१०) ऑन लाईन नामांतरणाच्या सॉफ्टवेअर मध्ये सर्व प्रकारचे रिपार्ट निघतात, वेगवेगळया अधिकाऱ्यांनी किती नामांतरणाच्या केसेस पार पाडल्या हे रिपार्ट सुध्दा निघतात.

११) शासकीय कामात पारदर्शीता व मन.पा.अधिकाऱ्यांचा वेळ वाचल्यामुळे नामांतरण प्रक्रियेचा बराच अवधी दिवसांनी कमी होणार आहे.

१२) मालमत्ता विक्री पंजीकरणाच्या वेळी अद्यावत मालमत्ता कर व मोकळयाजागेचा कर बेबाकी करणे सक्तीचे करुन महानगरपालिका उत्पन्नात भर पडेल व On-line-Mutation सेवा महानगरपालिकेच्या फायद्याची राहील.

मे.ढवंगाळे इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेस अशा कामांचा पुरेसा अनुभव असून, ही संस्था प्रकल्पाला लागणारी यंत्र सामुग्री जसे संगणक, मनुषबळ, स्टेशनरी, जागेचे भाडे इत्यादी संपूर्ण सेवा पुरविणार आहे व हा प्रकल्प बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या धर्तीवर असल्याने कार्यवाही शुल्क (Processing fees) प्रत्येक केस मागे रुपये ५०/- सेवा शुल्क संबधीत अर्जदाराकडून आकारेल. यापैकी रुपये ३५/- B.O.T. धारकास देऊन, उर्वरीत रुपये १५/- प्रत्येक केस मागे नामांतर फि च्या व्यतिरिक्त महानगरपालिकेस मिळतील.

या स्वरुपाचा प्रकल्प भूमी अभिलेख कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय व महानगरपालिका यांच्या समन्वयाने चालविणे योग्य होईल.

मे.ढवंगाळ इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेने नागपूर महानगरपालिकेमध्ये On-line-Mutation सेवा बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वावर सुरु केली असून, कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये सुध्दा या संस्थेकडून याच दराचे ही सेवा सुरु करण्यात आली आहे.

करीता नागपूर व कोल्हापूर महानगरपालिकेच्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे On-line-Mutation चे काम मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि., संचालक श्री विजय ढवंगळे यांचे मार्फत नागपूर व कोल्हापूर महानगरपालिकेने विहीत केलेल्या अटीं व शर्तीवर B.O.T. तत्वावर सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे समोर विचारार्थ तथा निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : ऐनवेळचा एक विषय घेण्यात येत आहे. या विषया संदर्भात संबधीत कंपनीचे ढवंगाळे प्रा. लि. चे संबधीत अधिकारी माहिती देत आहे ती आपण ऐकावी व या विषयाला ऐनवेळचा विषय म्हणून मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागपूर व कोल्हापूर महापालिकेच्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेत मालमत्ता नामांतर प्रक्रीयेत पारदर्शकता आणण्याचे दृष्टीने ज ङळशि र्चीींरींळीि चे काम प्रस्तावातील नमूद अटी शर्तीनुसार मे.ढवंगाळे इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेस बी.ओ.टी.तत्वावर (बांधा-वापरा-हस्तांतर करा) देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९९ :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको भागाचे दिनांक ०१.०४.२००६ पासून औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होत असून, हस्तांतरणाच्या करारनाम्यावर दिनांक ०३.०३.२००६ रोजी स्वाक्षऱ्या झालेल्या आहेत. सिडको सद्यस्थितीत सिडको भागात देत असलेल्या नागरी सेवा सुविधा, हस्तांतरणानंतर औरंगाबाद महानगरपालिकेस सिडकोच्या धर्तीवर दिनांक ०१.०४.२००६ पासून द्याव्या लागणार आहेत.

सिडको मार्फत ड्रेनेजचे चोकअप काढणे, किरकोळ दुरुस्त्या करणे, पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती (विद्युत व्यवस्था देखभाल दुरुस्ती करणे) उद्यानांची बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व संवर्धन करणे इत्यादी कामे खाजगी कंत्राटदारामार्फत वार्षीक देखभाल दुरुस्तीच्या निविदा काढून हाती घेण्यात येतात. त्याच धर्तीवर या विभागातर्फे सिडको भागातील सेवा सुविधा पुरविण्यासाठी कामांसाठी काढावयाच्या निविदा कार्यवाहीस पुरेसा अवधी नसल्याने आणि सुविधा दिनांक ०१.०४.२००६ पासून महापालिकेस द्यावयाच्या असल्याने दिनांक १८.०२.२००६ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्व साधारण सभेचा ठराव क्र.२०२/७ अन्वये या विभागातील निविदा सुचना प्रसिध्द करण्यासाठी कार्योत्तर मान्यता प्राप्त झालेली आहे. यानुसार औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने एन-२, एन-३, एन-४, शिवाजीनगर, सातारा इत्यादी भागातील पथदिव्यांची वार्षीक देखभाल दुरुस्ती करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम दरसूची सन २००५-०६ (विद्युत विभाग) व नागपूर महानगरपालिकेच्या दर व अटी/शर्तीनुसार रक्कम रुपये १५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन, निविदा सुचना क्र. ७५१/०६ दिनांक ०१.०३.२००६ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण तीन बंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांच्या दराबाबत तपशील पुढील प्रमाणे.

| | | अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
|---|---|---|
| १. | मे.अनिल इलेक्ट्रीकल अॅड असोसिएटस, नागपूर. | ६% जास्त व अतिरिक्त सर्व्हीस टॅक्स १२% सह |
| २. | मे.रिलायबल इंटरप्रायजेस, वर्धा. | ९.५०% जास्त व अतिरिक्त सर्व्हीस टॅक्स १२% सह |
| २. | मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर. | १०.५२% जास्त |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मक दृष्टया विचार करता मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांचे दर हे सर्वात कमी असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५२% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने

संबंधीतास दराच्या वाटाघाटी करणे साठी बोलाविण्यात आले. वाटाघाटी मध्ये संबंधीत कंत्राटदारांनी सर्व करांसह अंदाजपत्रकीय दराने काम करण्याची लेखी हमी दिलेली आहे. मा.आयुक्त यांनी मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांची सर्व करांसहीत अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्यतेस्तव स्थायी समीती सभे पुढे ठेवण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १५,००,०००/- चे अंदाजपत्रकाच्या मंजुरीसह मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांची सर्व करांसहीत अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने एन-२, एन-३, एन-४, शिवाजेनगर, सातारा इत्यादी भागातील पथदिव्यांची वार्षीक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीच्या र.रू१५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील कामासाठी मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा(सर्व करांसहीत) स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०० :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको भागाचे दिनांक ०१.०४.२००६ पासून औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होत असून, हस्तांतरणाच्या करारनाम्यावर दिनांक ०३.०३.२००६ रोजी स्वाक्षऱ्या झालेल्या आहेत. सिडको सद्यस्थितीत सिडको भागात देत असलेल्या नागरी सेवा सुविधा, हस्तांतरणानंतर औरंगाबाद महानगरपालिकेस सिडकोच्या धर्तीवर दिनांक ०१.०४.२००६ पासून द्याव्या लागणार आहेत.

सिडको मार्फत ड्रेनेजचे चोकअप काढणे, किरकोळ दुरुस्त्या करणे, पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती (विद्युत व्यवस्था देखभाल दुरुस्ती करणे) उद्यानांची बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व संवर्धन करणे इत्यादी कामे खाजगी कंत्राटदारामार्फत वार्षीक देखभाल दुरुस्तीच्या निविदा काढून हाती घेण्यात येतात. त्याच धर्तीवर या विभागातर्फे सिडको भागातील सेवा सुविधा पुरविण्यासाठी कामांसाठी काढावयाच्या निविदा कार्यवाहीस पुरेसा अवधी नसल्याने आणि सुविधा दिनांक ०१.०४.२००६ पासून महापालिकेस द्यावयाच्या असल्याने दिनांक १८.०२.२००६ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्व साधारण सभेचा ठराव क्र. २०२/७ अन्वये या विभागातील निविदा सुचना प्रसिध्द करण्यासाठी कार्योत्तर मान्यता प्राप्त झालेली आहे. यानुसार औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने एन-१, एन-५,एन-६,एन-७ व एन-८ इत्यादी भागातील पथदिव्यांची वार्षीक देखभाल दुरुस्ती करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम दरसूची सन २००५-०६ (विद्युत विभाग) व नागपूर महानगरपालिकेच्या दर व अटी/शर्तीनुसार रक्कम रुपये १५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन, निविदा सुचना क्र. ७५१/०६ दिनांक ०१.०३.२००६ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांच्या दराबाबत तपशील पुढील प्रमाणे.

| | | अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
|---|---|---|
| १. | मे.अनिल इलेक्ट्रीकल ॲड असोसिएटस, नागपूर. | ६% जास्त व अतिरिक्त सर्व्हीस टॅक्स १२% सह |
| २. | मे.रिलायबल इंटरप्रायजेस, वर्धा. | ९.५०% जास्त व अतिरिक्त सर्व्हीस टॅक्स १२% सह |
| ३. | मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर. | १०.५२% जास्त |
| ४. | मे.साधना इलेक्ट्रीक वर्क्स, नागपूर. | १३.६०% जास्त |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मक दृष्टया विचार करता मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांचे दर हे सर्वात कमी असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५२% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने संबंधीतास दराच्या वाटाघाटी करणे साठी बोलाविण्यात आले. वाटाघाटी मध्ये संबंधीत कंत्राटदारांनी सर्व करांसह

अंदाजपत्रकीय दराने काम करण्याची लेखी हमी दिलेली आहे. मा.आयुक्त यांनी मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांची सर्व करांसहीत अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्यतेस्तव स्थायी समीती सभे पुढे ठेवण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १५,००,०००/- चे अंदाजपत्रकाच्या मंजुरीसह मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांची सर्व करांसहीत अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**<u>ठराव</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने एन-१, एन-५, एन-६, एन-७, व एन-८ इत्यादी भागातील पथदिव्यांची वार्षीक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीच्या र.रू.१५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील कामासाठी मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा(सर्व करांसहीत) स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.३०१ :</u>**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको भागाचे दिनांक ०१.०४.२००६ पासून औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होत असून, हस्तांतरणाच्या करारनाम्यावर दिनांक ०३.०३.२००६ रोजी स्वाक्षऱ्या झालेल्या आहेत. सिडको सद्यस्थितीत सिडको भागात देत असलेल्या नागरी सेवा सुविधा, हस्तांतरणानंतर औरंगाबाद महानगरपालिकेस सिडकोच्या धर्तीवर दिनांक ०१.०४.२००६ पासून द्याव्या लागणार आहेत.

सिडको मार्फत ड्रेनेजचे चोकअप काढणे, किरकोळ दुरुस्त्या करणे, पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती (विद्युत व्यवस्था देखभाल दुरुस्ती करणे) उद्यानांची बारा महिने कालावधीसाठी संगोपन, संरक्षण, विकास व संवर्धन करणे इत्यादी कामे खाजगी कंत्राटदारामार्फत वार्षीक देखभाल दुरुस्तीच्या निविदा काढून हाती घेण्यात येतात. त्याच धर्तीवर या विभागातर्फे सिडको भागातील सेवा सुविधा पुरविण्यासाठी कामांसाठी काढावयाच्या निविदा कार्यवाहीस पुरेसा अवधी नसल्याने आणि सुविधा दिनांक ०१.०४.२००६ पासून महापालिकेस द्यावयाच्या असल्याने दिनांक १८.०२.२००६ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्व साधारण सभेचा ठराव क्र.२०२/७ अन्वये या विभागातील निविदा सुचना प्रसिध्द करण्यासाठी कार्योत्तर मान्यता प्राप्त झालेली आहे. यानुसार औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने एन-९ ते एन-१३ भागातील पथदिव्यांची वार्षीक देखभाल दुरुस्ती करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम दरसूची सन २००५-०६ (विद्युत विभाग) व नागपूर महानगरपालिकेच्या दर व अटी/शर्तीनुसार रक्कम रुपये १५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन, निविदा सुचना क्र. ७५१/०६ दिनांक ०१.०३.२००६ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण तीन ाबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांच्या दराबाबत तपशील पुढील प्रमाणे.

| | | अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
|---|---|---|
| १. | मे.अनिल इलेक्ट्रीकल ॲड असोसिएटस, नागपूर. | ६% जास्त व अतिरिक्त सर्व्हीस टॅक्स १२% सह |
| २. | मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर. | १०.५२% जास्त |
| ३. | मे.साधना इलेक्ट्रीक वर्क्स, नागपूर. | ११.७% जास्त |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मक दृष्टया विचार करता मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांचे दर हे सर्वात कमी असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५२% जास्त दराचे आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने संबंधीतास दराच्या वाटाघाटी करणे साठी बोलाविण्यात आले. वाटाघाटी मध्ये संबंधीत कंत्राटदारांनी सर्व करांसह अंदाजपत्रकीय दराने काम करण्याची लेखी हमी दिलेली आहे. मा.आयुक्त यांनी मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांची सर्व करांसहीत अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्यतेस्तव स्थायी समीती सभे पुढे ठेवण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १५,००,०००/- चे अंदाजपत्रकाच्या मंजुरीसह मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांची सर्व करांसहीत अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील कॉम्प्रेहेन्सीव्ह पध्दतीने एन-९, ते एन-१३ इत्यादी भागातील पथदिव्यांची वार्षीक देखभाल दुरूस्ती करण्यासाठीच्या र.रू.१५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील कामासाठी मे.सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा(सर्व करांसहीत) स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०२ :**

संचालक, प्राणी संग्रहालय यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००६-०७ (१.४.२००६ ते ३१.३.२००७) या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांकरीता बीफ (खन्नी) खरेदी करणे करीता निविदा मागविण्यात आल्या असता एकूण १३ कोऱ्या निविदांची विक्री झाली असून त्यापैकी ४ भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | भाव प्रति किलो |
|---|---|---|
| १ | श्री.गफुर मिया कुरैशी | रू.३०.५० |
| २ | श्री.अ.करीम अ.रहिम | रू.३१.४५ |
| ३ | श्री.अ.हमीद शेख हनीफ | रू.३२.४० |
| ४ | श्री.फेरोजखॉन रहेमान खॉन | रू.३४.०० |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर श्री.गफुर मिया कुरैशी यांचे रू.३०.५० प्रति किलो असून संबंधीताशी मा.आयुक्त यांचे सोबत झालेल्या चर्चेनंतर त्यांनी रू.३०.५० प्रति किलो हे दर कमी करून रू.२७.०० प्रति किलो या दराने पुरवठा करण्याची तयारी दर्शविली आहे. करीता या दरास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००६-०७ (१.४.२००६ ते ३१.३.२००७) या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांकरीता बीफ (खन्नी) खरेदी करणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार श्री.गफुर मिया कुरैशी यांची रू.२७.०० (सत्तावीस रूपये) प्रति किलो या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०३ :**

कार्यकारी अभियंता(ड्रेनेज, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, एन-९ आर-२६ प्रतापगडनगर, म्हाडा मधील ड्रेनेज लाईन अपरूटीन करणे व चेंबर बांधणे या कामाचे अंदाजपत्रक र.रू.२,४९,६००/- महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण यांचे दरसूची २००४-०५ नुसार तयार करण्यात आले आहे. सदरील काम तातडीने करून घेणे गरजेचे असल्यामुळे

उपलब्ध ठेकेदार श्री.सुनिल आढाव यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर सादर करण्यास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

तरी सदर कामाच्या र.रू.२,४९,६००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम उपलब्ध ठेकेदार श्री.सुनिल आढाव यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराने करून घेण्याच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-९ आर-२६ प्रतापगडनगर, म्हाडा मधील ड्रेनेज लाईन अपरूटीन करणे व चेंबर बांधणेचे काम तातडीने करून घेणे गरजेचे असल्यामुळे उपलब्ध ठेकेदार श्री.सुनिल आढाव यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराने करून घेण्यास तसेच सदर कामासाठी लागणाऱ्या र.रू.२,४९,६००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.११ व १२ फेब्रुवारी रोजी औरंगाबाद शहरात गरवारे क्रिडा संकुल येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय बहुभाषीक ब्राम्हण समाजचे अधिवेशनासाठी आलेल्या समाजबांधवांसाठी तातडीने तात्पुरत्या स्वरूपाचे स्वच्छतागृह बांधण्यास, मोफत पिण्याचे पाणी पुरविण्यास आणि क्रिडा संकुलाच्या समोरील भाग व आतील भागाची साफसफाई करण्यास तसेच सदरील कामे तात्काळ करणे आवश्यक असल्याने उपरोक्त कामे त्वरीत करण्यास व त्यासाठी र.रू.५०,०००/- च्या खर्चास मा.स्थायी समिती सभा दि.७.२.२००६ ठराव क्र.२१९ नुसार मान्यता झालेली आहे. मान्यतेनुसार सदरील कामे तातडीने उपलब्ध ठेकेदार श्री.शे.असद शे.रशीद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने दि.१०.२.२००६ रोजी पूर्ण करून घेण्यात आले आहेत. तरी कार्योत्तर मान्यतेस्तव व संबंधीतास झालेल्या कामाचे देयक देणेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि.११ व १२ फेब्रुवारी रोजी औरंगाबाद शहरात गरवारे क्रिडा संकुल येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय बहुभाषीक ब्राम्हण समाजचे अधिवेशनासाठी तातडीने तात्पुरत्या स्वरूपाचे स्वच्छतागृह बांधणे व इतर सुविधा पुरविण्यासंबंधी उपलब्ध ठेकेदार श्री.शे.असद शे.रशीद यांचेकडून करून घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येऊन स्थायी समितीचा ठराव क्र.२१९ मध्ये नमूद रू.५० हजरच्या खर्च मर्यादित झालेल्या कामाचे देयक अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

" राष्ट्रगितानंतर" सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद